विकास व कल्याण

# महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ,मुंबई.

एमएमटीसी हाऊस, पाचवा मजला प्लॉट नं. सी २२,
ब्लॉक ई - , वांद्रे- कुर्ला संकुल बान्द्रा (पुर्व),मुंबई ४०० ०५१ .

## महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या ५९ व्या बैठकीचे इतिवृत्तांत

*******

| | | |
|---|---|---|
| बैठक स्थळ | :- | मा. मंत्री, (कामगार) यांचे दालन क्र.११६, ०१ ला मजला, मंत्रालय, मुंबई |
| दिनांक | :- | १२.१२.२०२२ (सोमवार) |
| वेळ | :- | दुपारी १२.०० ते १.०० |

| अ.क्र. | बैठकीचा विषय |
|---|---|
| १ | मंडळातील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगार, नाका बांधकाम कामगार व अनोंदीत बांधकाम कामगारांना मध्यान्ह भोजनासह रात्रीचे भोजन विनाशुल्क पुरविण्याच्या योजनेस मुदतवाढीस मंजूरी देणे तसेच भोजन वितरीत करताना भोजन वितरण प्रणाली (**RF- Based Card**) द्वारे कार्यवाही करण्याबाबत धोरण निश्चिती करणे. |
| २ | मंडळाकडील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना कौशल्य विकास वृध्दीकरण प्रशिक्षणाचा लक्ष्यांक निश्चिती व बांधकाम कामगारांच्या प्रशिक्षणाअंती मूल्यमापनाकरीता संस्था नियुक्ती करणे. |
| ३ | मंडळांतर्गत नोंदीत सक्रिय बांधकाम कामगारांकरीता घरकुल योजना म्हाडा, सार्वजनिक खाजगी भागीदारी, बांधकाम कामगारांच्या समूहामार्फत सोसायटीची निर्मितीद्वारे राबविण्यास धोरण निश्चितीस मंजूरी देणे. |
| ४ | मंडळाकडील नोंदणी व विविध कल्याणकारी योजनांची जनजागृती करण्यासाठी प्रसार प्रसिध्दीच्या माध्यम आराखडा रू.**३०** कोटी वरून रू.**१००** कोटी करण्याच्या सुधारित प्रसार प्रसिध्दी माध्यम आराखडयास मंजूरी देणे व सन **२०२३-२४** चा नवीन प्रसार प्रसिध्दी माध्यम आराखडा तयार करण्यास मंजूरी देणे. |
| ५ | राज्यातील महानगरपालिका/ नगरपालिका क्षेत्रात बांधकाम कामगारांकरीता नाक्याच्या ठिकाणी तात्पुरत्या स्वरूपात शेड उभारणेस योजना राबविणेबाबत मंजूरी देणे. |
| ६ | मंडळातील मुख्यालय व अधिनस्त जिल्हा कार्यालयाच्या अभिलेख कक्षाचे अद्यावतीकरणांतर्गत कॉपेक्टर स्टोरेज व अभिलेख स्कॅनिंग ॲण्ड डिजिटायझेशन करून घेणेचे कामास मंजूरी देणे. |
| ७ | मंडळातील बांधकाम कामगारांच्या तक्रारींचे निवारण करण्याकरीता हेल्पलाईन सेवा राज्यस्तरीय **०१** व विभाग स्तरावर **०६** ठिकाणी कार्यन्वित करण्याच्या धोरण निश्चितीस मंजूरी देणे. |
| ८ | बांधकाम कामगारांच्या नोंदणी व नुतनीकरणातील तांत्रिक अडचणी कमी करून नोंदणी नुतनीकरणामध्ये वाढ करण्याच्या अनुषंगाने बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण शुल्काची रक्कम रू.**०१**/- इतकी ठेवणे, नोंदणी/ नुतनीकरणाचा अर्ज ज्या दिनांकास मंजूर करण्यात येईल त्या दिनांकापासून वैधता **०१** वर्ष ठेवणे, लॉग इन आयडी वाढवून देणे व **IWBMS** संगणक प्रणाली लॉगिन आयडी मध्ये एकावेळी **५०** अर्ज दिसतील अशी सुधारणा करणे इत्यादी धोरणात्मक निर्णयास मंजूरी देणे. |

| अ.क्र. | बैठकीचा विषय |
|---|---|
| ९ | मंडळाचे मा. अध्यक्ष तथा मंत्री महोदय, कामगार विभाग यांचेकरीता वाहन खरेदीस मंजूरी देणे व मा.मंत्री कार्यालय (कामगार) यांचेकरीता दोन वाहने भाडयाने घेणेबाबत, मंडळ मुख्यालय व क्षेत्रिय कार्यालयांसाठी आवश्यकतेनुसार वाहने भाडयाने घेण्यास मुदतवाढ देणे. |
| १० | मंडळाच्या बैठका आयोजित करण्यासाठी मंत्रालय परिसरात कार्यालयीन जागा भाडयाने घेण्याबाबत, मंडळ मुख्यालयासाठी कायमस्वरूपी कार्यालयीन जागा व इमारत बांधकामास मंजूरी देणे. |
| ११ | मंडळांतर्गत नोंदीत बांधकाम कामगारांना विविध कल्याणकारी योजनेंतर्गत थेट लाभ हस्तांतरण **(DBT)** द्वारे लाभ वाटपासाठी स्वतंत्र बँक खाते उघडण्यास मंजूरी देणे. |
| १२ | मंत्रालयीन व मंडळाकडील संगणक विषयक कामकाजाकरीता संगणक तांत्रिक सल्लागारांच्या (ग्रॅन्ट थॉर्न्टन) नियुक्तीस मुदतवाढ देणे. |
| १३ | लखनऊ (उत्तर प्रदेश) येथे उपकर संकलन कार्यपध्दतीचा आढावा घेण्याकरीता अभ्यास दौरा आयोजित करणे |
| १४ | बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण, लाभ वाटपाबाबतची माहिती मंडळाच्या पटलावर ठेवणे. |
| १५ | मंडळाकडील उपकर जमा व योजनानिहाय खर्चास मंजूरी देणे. |
| १६ | मंडळाकडील अतिरिक्त निधीची गुंतवणूक राष्ट्रीयीकृत बँकेत गुंतवणूक करण्यासाठी मंजूरी देणे. |
| १७ | मा. उच्च न्यायालय मुबई याचिका क्र. **२७६९६/२०२१,** रिट याचिका क्र.**७७०१/२०२२,** मे. आरसीएस इन्फोटेक प्रा.लि.व मे. आयटी आय लिमिटेड लवाद प्रकरणी कोविड विषाणू प्रादुर्भाव कालावधीत देण्यात आलेल्या अर्थसहाय्यापोटी झालेला खर्च वसूली प्रकरणी धोरणात्मक निर्णय घेणे. |
| १८ | शासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना सेवा करार पध्दतीने विवक्षित पध्दतीने कामाकरीता नियुक्त करण्यास मंजूरी देणे. |
| १९ | उपकर परतावा प्रकरणांना मान्यता देणे |
| २० | महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत बांधकाम कामगारांची नोंदणी मंडळाच्या अंतर्गत करणेस मंजूरी देणे. |
| २१ | मंडळ मुख्यालयाच्या व क्षेत्रिय कार्यालयाच्या सुधारित आकृतीबंधास मान्यता देणे. |
| २२ | मंडळाकडे जमा होणाऱ्या उपकराची अचूक पडताळणी होण्यासाठी व उपकर संकलात वाढ होण्याच्या उपाययोजनेकरीता सनदी लेखापाल **(CA)/** तांत्रिक सल्लागार संस्थेची **(Agency)** नियुक्ती करण्यास मंजूरी देणे. |

| अ.क्र. | बैठकीचा विषय |
|---|---|
| २३ | मंडळाचे सन **२०२०-२१** या आर्थिक वर्षाच्या "वार्षिक जमा खर्चाच्या लेख्यास" **(Annual Account)** मंडळाची मान्यता घेणे व तदनंतर सदर लेखे राज्य शासन व महालेखापाल कार्यालयास सादर करणेस मंजूरी देणे. |
| २४ | मंडळाकडील बांधकाम कामगारांना सुरक्षा संच व अत्यावश्यक संच पुरविणाऱ्या योजनेचा आढावा घेणे व दि.**०१.०४.२०२२** रोजी नंतर नोंदीत बांधकाम कामगारांना सुरक्षा संच व अत्यावश्यक संचाचे वाटप करणे तसेच, निर्धारित लक्षांकानुसार शिल्लक संच वाटपाचे मागणीनुसार जिल्हयांना लक्षांक निर्धारण करणे व योजनेस मुदतवाढ देण्याच्या धोरणात्मक निर्णयास मंजूरी देणे. |
| २५ | मा.अध्यक्ष यांच्या मान्यतेने आयत्या वेळेचे विषय |

## महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दिनांक १२.१२.२०२२ रोजी संपन्न झालेल्या ५९ व्या बैठकीचे इतिवृत्त

मा. ना. श्री. सुरेश (भाऊ) दगडू खाडे, मंत्री (कामगार) तथा मा.अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची ५९ वी बैठक सोमवार दिनांक १२.१२.२०२२ रोजी दुपारी १२.०० वा. मा. मंत्री, (कामगार) यांचे दालन क्र.११६, ०१ ला मजला, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२ येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य बैठकीस उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १ | मा. ना. श्री. सुरेश (भाऊ) दगडू खाडे, मंत्री (कामगार) | मा.मंत्री (कामगार) तथा मा.अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई |
| २ | श्रीमती विनिता वेद सिंगल, प्रधान सचिव, कामगार | शासकीय प्रतिनिधी |
| ३ | श्री. सुरेश जाधव, कामगार आयुक्त | शासकीय प्रतिनिधी |
| ४ | श्री. दादासाहेब खताळ, उप सचिव कामगार - ७ | शासकीय प्रतिनिधी |
| ५ | श्री. विवेक शंकर कुंभार | सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई |

बैठकीच्या सुरुवातीस मंडळाचे सचिव यांनी श्री. विवेक कुंभार यांनी मा. ना. श्री. सुरेश (भाऊ) दगडू खाडे, मंत्री (कामगार), श्रीमती विनिता वेद सिंगल, प्रधान सचिव, कामगार, श्री. सुरेश जाधव, कामगार आयुक्त व श्री. दादासाहेब खताळ, उप सचिव कामगार - ७ या उपस्थितांचे स्वागत केले. बैठकीत चर्चा करावयाच्या विषयांशी संबंधित कागदपत्रांचा संचाच्या प्रती सर्व उपस्थितांना वाटप करण्यात आल्या.तद्नंतर विषयसूचीनुसार चर्चेस सुरुवात करण्यात आली.

**विषय क्र.०१ :-** **मंडळातील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगार, नाका बांधकाम कामगार व अनोंदीत बांधकाम कामगारांना मध्यान्ह भोजनासह रात्रीचे भोजन विनाशुल्क पुरविण्याच्या योजनेस मुदतवाढीस मंजूरी देणे तसेच भोजन वितरीत करताना भोजन वितरण प्रणाली (RF- Based Card) द्वारे कार्यवाही करण्याबाबत धोरण निश्चिती करणे.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की,मंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या मध्यान्ह भोजन योजना शासन मान्यतेने विशेष सूचना व सवलतीसह वेळोवेळी मुदतवाढी देण्यात आल्या आहेत.

२. कोविड-१९ विषाणूचा प्रदुर्भाव कमी होऊन राज्य शासनाने निर्बंध शिथील केल्याने सद्यस्थितीत मध्यान्ह भोजन योजना सदर योजनेच्या सर्व अटी शर्तीसह केवळ नोंदीत बांधकाम कामगारांना राबविणे, बांधकाम कामगार हिश्याची रू.०५/- रक्कम वसूल करणे व योजनेच्या अंमलबजाणीबाबत कोविड कालावधीतील सर्व सवलती दिनांक १५.०५.२०२२ पासून बंद करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्रस्ताव सादर केला होता. शासनास सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने, शासनाने दिनांक १७.०६.२०२२ रोजीच्या पत्रान्वये दिनांक १५.०८.२०२२ पर्यंत नोंदीत व अनोंदीत बांधकाम कामगारांसह नाका कामगारांना देण्यात येत असलेल्या सवलतींसह मध्यान्ह भोजनासह रात्रीचे भोजन देण्यात यावे अशा सूचना निर्गमित करण्यात आल्या होत्या. त्या अनुषंगाने कार्यवाही करणेबाबत जिल्हा कार्यालयांना अवगत करण्यात आले होते.

३. मंडळ सचिव यांनी सादर केले की, लोकप्रतिनिधी व क्षेत्रिय कार्यालयांची मागणी व पुरग्रस्त परिस्थिती विचारात घेवून, नोंदीत बांधकाम कामगार, अनोंदीत बांधकाम कामगार व नाका बांधकाम कामगारांना मध्यान्ह भोजनासह रात्रीचे भोजन सवलतीसह पावसाळा संपेपर्यंत दिनांक ३०.०९.२०२२२ पर्यंत सुरू ठेवण्याबाबत मंडळाच्या सचिवांनी दिनांक १२.०८.२०२२ अन्वये शासनास प्रस्ताव सादर केला होता. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने, शासनाच्या दिनांक ०५.०९.२०२२ रोजीच्या पत्रान्वये दिनांक १५.०८.२०२२ पासून दिनांक ३०.११.२०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली असून, सर्व सवलतींसह मध्यान्ह व रात्रीचे भोजन देण्याबाबत कळविण्यात आले आहे. तसेच दिनांक ०१.१२.२०२२ पासून फक्त नोंदीत बांधकाम कामगारांना मध्यान्ह व रात्रीच्या भोजनाचा लाभ दयावा असे कळविले आहे. त्या अनुषंगाने मंडळाच्या दिनांक ०५.०९.२०२२ रोजीच्या पत्रान्वये कार्यवाही करणेबाबत सर्व जिल्हा कार्यालयांना कळविण्यात आले आहे.

४. मंडळ सचिव यांनी सादर केले की, बांधकाम कामगारांची नोंदणी व नुतनीकरण प्रक्रिया निरंतर स्वरूपाची असली तरी मागील ०४ महिन्यात नोंदणी व नुतनीकरणामध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. तथापि, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अंतर्गत मोठ्या प्रमाणात बांधकामे सुरू असूनही बांधकाम कामगारांची अल्प नोंदणी झाली आहे.तसेच, महाराष्ट्रातील

अन्य जिल्ह्यामध्येही बांधकाम कामगारांची नोंदणी करणे प्रलंबित असल्याचे निदर्शनास येत आहे.महाराष्ट्रातील काही ठीकाणी नाका बांधकाम कामगार, अनोंदित बांधकाम कामगार यांची अल्प नोंदणी व नुतनीकरणाचे प्रमाण लक्षात घेता अनोंदित बांधकाम कामगारांच्या नोंदणीची प्रक्रिया पुढील ०६ महिने सुरू राहण्याची शक्याता आहे. मध्यान्ह भोजन योजना नोंदीत बांधकाम कामगारांसह अनोंदीत बांधकाम कामगारांना सुरू ठेवणेबाबत मा. लोकप्रतिनिधी यांच्या मागणीनुसार व प्रलंबित नोंदणी व नुतनीकरणात वाढ होईपर्यंत मध्यान्ह भोजन योजनेच्या लाभापासून बांधकाम कामगार वंचित राहू नये याकरीता नोंदीत बांधकाम कामगार, नाका बांधकाम कामगार व अनोंदीत बांधकाम कामगारांना मध्यान्ह भोजन योजना सवलतीसह पुढील आदेशापर्यंत सुरू ठेवणेबाबतचा प्रस्ताव शासन मान्यतेस दिनांक ३०.११.२०२२ रोजी सादर करण्यात आला आहे. शासन मान्यतेनुसार पुढील कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

५. मंडळ सचिव यांनी सादर केले की, शासनाच्या दिनांक २२.०६.२०२२ रोजीच्या पत्रान्वये मध्यान्ह भोजन योजनेमध्ये भोजन वितरण कार्ड प्रणालीमार्फत नोंदी घेताना येणाऱ्या अडचणी विचारात घेऊन भोजन वितरण करताना किमान तीन महिने बायोमॅट्रीक पध्दतीने नोंद घेण्यास मान्यता प्रदान करण्यात आली होती. सदर मान्यतेच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याबाबत सर्व जिल्हा कार्यालयांना अहवाल सादर करणेबाबत मंडळाच्या दिनांक २९.०६.२०२२ अन्वये कळविण्यात आले होते. मंडळाचे सदस्य व मा.अध्यक्ष यांच्या विचारविनिमयाने, मा. अध्यक्ष यांनी भोजन वितरण करताना भोजन वितरण प्रणाली (RF-Based Card) द्वारे वितरीत करावे. सदरचे RF- Based कार्ड सर्व नोंदीत बांधकाम कामगारांना दि.३१.०३.२०२३ पर्यंत वितरीत करावे व दिनांक ०१.०४.२०२३ पासून भोजन वितरण प्रणाली (RF-Based Card) द्वारे वितरीत करण्यात यावे असेही निर्देश मा.अध्यक्ष यांनी सदर बैठकीत दिले.

६. मा. कामगार आयुक्त तथा शासकीय प्रतिनिधी यांनी मध्यान्ह भोजन योजनेबाबत प्राप्त होणाऱ्या तक्रारींचा विचार करण्याबाबत मत मांडले. सदर प्राप्त तक्रारीमध्ये मध्यान्ह भोजन योजनेच्या जेवणाची गुणवत्ता बाबत मुद्दे उपस्थित करण्यात आले आहेत. त्याबाबत मा. अध्यक्ष यांनी मंडळ सचिव यांना सर्व जिल्हयांकडून स्वयंपाकगृहाचे तसेच, ज्या जिल्हयात भोजन वाटप केले जाते त्यांचेकडून अन्न प्रशासन औषध विभागाचे जेवणाच्या गुणवत्तेबाबतचे प्रमाणपत्र प्राप्त करण्याबाबत निर्देश दिले.

सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र.५९(१)/२०२१ :-**

**(अ) लोकप्रतिनिधी व क्षेत्रिय कार्यालयांची मागणी व पुरग्रस्त परिस्थिती विचारात घेवून, नोंदीत बांधकाम कामगार, अनोंदीत बांधकाम कामगार व नाका बांधकाम कामगारांना मध्यान्ह भोजनासह रात्रीचे भोजन सवलतीसह पावसाळा संपेपर्यंत दिनांक ३०.०९.२०२२२ पर्यंत सुरू ठेवण्याबाबत**

मंडळाच्या सचिवांनी दिनांक १२.०८.२०२२ अन्वये शासनास सादर केलेल्या प्रस्तावाच्या कार्यवाहीस मंडळाची मान्यता.

(ब) राज्यातील लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार तसेच, प्रलंबित नोंदणी व नुतनीकरणात वाढ होईपर्यंत नोंदीत बांधकाम कामगार, अनोंदीत बांधकाम कामगार व नाका बांधकाम कामगारांना मध्यान्ह भोजन योजना सवलतीसह पुढील आदेशापर्यंत सुरू ठेवणेबाबतचा मंडळाकडील दि.३०.११.२०२२ अन्वये शासनास सादर केलेल्या प्रस्तावाच्या कार्यवाहीस मंडळाची मान्यता.

(क) भोजन वितरण करताना भोजन वितरण प्रणाली (RF-Based Card) द्वारे वितरीत करण्याची व्यवस्था करण्यात यावी. सदर RF- Based कार्ड सर्व नोंदीत बांधकाम कामगारांना दि.३१.०३.२०२३ पर्यंत वितरीत करावे व दि.०१.०४.२०२३ पासून भोजन वितरण प्रणाली (RF-Based Card) द्वारे भोजन वितरीत करण्यात यावे.

(ड) मध्यान्ह भोजन योजनेबाबत जेवणाच्या गुणवत्तेबाबत अन्न प्रशासन औषध विभागाचे जेवणाच्या गुणवत्तेबाबतचे प्रमाणपत्र प्राप्त करण्यात यावे.

उपरोक्त ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याण मंडळ, मुंबई

**विषय क्र.०२ :- मंडळाकडील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना कौशल्य विकास वृध्दीकरण प्रशिक्षणाचा लक्ष्यांक निश्चिती व बांधकाम कामगारांच्या प्रशिक्षणाअंती मूल्यमापनाकरीता संस्था नियुक्ती करणे.**

मंडळ सचिवांनी असे सादर केले की, मंडळाकडील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना कौशल्य वृध्दीकरण योजनेच्या प्रशिक्षणाकरीता निवड झालेल्या १४ संस्थांना दि.२७.९.२०२२ रोजी मा. मंत्री (कामगार) यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित बैठकीत नियुक्त संस्थांनी त्यांचेकडील प्रशिक्षण, संस्थाचा या पूर्वीच्या प्रशिक्षणातील अनुभव, उपलब्ध मनुष्यबळ व साधन सामुग्री, प्रशिक्षण साहित्य व अनुषंगिक बाबींकरीता सादरीकरण केले. संबंधित संस्थांनी सादर केलेल्या सादरीकरणावरून नियुक्त संस्थांना बांधकाम कामगारांना दयावयाच्या प्रशिक्षणाचा लक्ष्यांक सादरीकरणातील निर्देशानुसार खालीलप्रमाणे प्रस्तावित करण्यात आले आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नाव | विभाग | जिल्हा सुविधा केंद्राचे नाव | जिल्ह्याचे लक्ष्यांक | संस्थेचे प्रस्तावित एकूण लक्ष्यांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | मे. इंडस एड्यु ट्रेन प्रा. लि | औरंगाबाद | औरंगाबाद | १६,३१४ | ५४,३२५ | गुणांकनामध्ये प्रथम तीन असलेल्या संस्थामध्ये प्रथम दोन तृतीयांश लक्ष्यांकाचे वाटप प्रस्तावित करण्यात आले आहे. यामध्ये चार विभागांचा समावेश करण्यात आला आहे. यामधील |
| | | | जालना | ८,००४ | | |
| | | | नांदेड | ६,२५४ | | |
| | | | परभणी | ५,९३० | | |
| | | | बीड | ५,२७० | | |
| | | | हिंगोली | २,६४९ | | |
| | | | लातूर | २,२८१ | | |
| | | | उस्मानाबाद | ६९० | | |
| | | नाशिक | जळगाव | ३,६९१ | | |
| | | | धुळे | ३,२४२ | | |
| २. | टाईम्स सेंटर फॉर लर्निंग लि. | पुणे | कोल्हापूर | ३९,३८४ | ५४,०८८ | |
| | | | इचलकरंजी | ५,६४७ | | |
| | | | सातारा | २,५३० | | |
| | | नाशिक | अहमदनगर | ६,५२७ | | |
| | | पुणे | सांगली | १३,६६७ | ५३,९२५ | |
| | | | पुणे | १३,२०० | | |
| | | | सोलापूर | ९,६६१ | | |

| अ.क्र. | संस्थेचे नाव | विभाग | जिल्हा सुविधा केंद्राचे नाव | जिल्ह्याचे लक्ष्यांक | संस्थेचे प्रस्तावित एकूण लक्ष्यांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| ३. | स्कील ट्री कन्सटिंग प्रा. लि. | नागपूर | वर्धा | ६,७७५ | | क्षेत्रफळाने मोठा असलेल्या औरंगाबाद पुर्ण विभाग व नाशिक विभागामधील दोन जिल्हा सुविधा केंद्रे प्रथम क्रमांकाच्या संस्थेस प्रस्तावित. द्वितीय क्रमांकावर असलेल्या संस्थेस पुणे विभागातील तीन जिल्हा सुविधा केंद्रे व नाशिक विभागातील एक जिल्हा सुविधा केंद्र प्रस्तावित केले आहे.तसेच, तृतीय क्रमांकावर असलेल्या संस्थेस पुणे व |
| | | | नागपूर | ४,३५९ | | |
| | | | भंडारा | ३,२४५ | | |
| | | नाशिक | नाशिक | ३,०१८ | | |

| अ.क्र. | संस्थेचे नाव | विभाग | जिल्हा सुविधा केंद्राचे नाव | जिल्ह्याचे लक्ष्यांक | संस्थेचे प्रस्तावित एकूण लक्ष्यांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | नागपूर विभागातील प्रत्येकी तीन व नाशिक विभागातील एक जिल्हा सुविधा केंद्र प्रस्तावित केले आहे. तसेच, लक्ष्यांक हे उतरत्या क्रमाने ठेवण्यात आले आहे. |
| ४. | पिपल ट्रि व्हेन्चर प्रा.लि. | अमरावती | बुलढाणा | १०,४१५ | १७,६८४ | तृतीय क्रमांकाशी समान गुण धारण करीता असल्याने अमरावती विभागातील जास्त लक्ष्यांक असलेली दोन जिल्हा सुविधा केंद्रे प्रस्तावित |
| | | | अमरावती | ७,२६९ | | |
| ५. | सिमॅसेस लर्निंग एलएलपी | अमरावती | यवतमाळ | ६,३८२ | ११,६४० | पाचव्या क्रमांकाच्या संस्थेस |
| | | | अकोला | ४,२४५ | | |
| | | | वाशिम | १,०१३ | | |

| अ.क्र. | संस्थेचे नाव | विभाग | जिल्हा सुविधा केंद्राचे नाव | जिल्ह्याचे लक्ष्यांक | संस्थेचे प्रस्तावित एकूण लक्ष्यांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | अमरावती विभागातील उर्वरीत कमी लक्ष्यांक असलेली तीन जिल्हा सुविधा केंद्रे प्रस्तावित |
| ६. | लेबरनेट सर्व्हिसेस इंडीया प्रा.लि. | नागपूर | चंद्रपूर | १,८८७ | ५,४१२ | सहाव्या क्रमांकाच्या संस्थेस नागपूर विभागातील उर्वरीत कमी लक्ष्यांक असलेली तीन जिल्हा सुविधा केंद्रे व नाशिक जिल्ह्यातील उर्वरीत एक जिल्हा सुविधा केंद्र प्रस्तावित |
| | | | गडचिरोली | १,८४८ | | |
| | | | गोंदिया | १,१५५ | | |
| | | नाशिक | नंदुरबार | ५२२ | | |
| ७. | मोसॅक वर्कस्किल प्रा.लि. | कोकण | मुंबई शहर | २,४७५ | ४,३९८ | उर्वरीत आठ संस्थांना कोकण विभागातील जिल्हा सुविधा केंद्रे |
| | | कोकण | पनवेल | १,९२३ | | |
| ८. | पॅलेडीअम कन्सिल्टींग इंडीया प्रा. लि. | कोकण | सिंधुदूर्ग | १,६७७ | १,६७७ | |

| अ.क्र. | संस्थेचे नाव | विभाग | जिल्हा सुविधा केंद्राचे नाव | जिल्ह्याचे लक्ष्यांक | संस्थेचे प्रस्तावित एकूण लक्ष्यांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| ९. | भावसार फाऊंडेशन | कोकण | मुंबई उपनगर पश्चिम | १,४२३ | १,४२३ | क्रमवारीनुसार प्रस्तावित |
| १० | युगशक्ती सैक्षणिक एवम सामाजिक विकास संस्था | कोकण | ठाणे | १,२२२ | १,२२२ | |
| ११ | ब्रॉडकास्ट इंजनिअरींग कन्सल्टंट इंडीया लि. | कोकण | पालघर | १,१७४ | १,१७४ | |
| १२ | जे.आय.टी.एम. स्कील प्रा.लि. | कोकण | मुंबई उपनगर पूर्व | १,०४४ | १,०४४ | |
| १३ | एसटेक | कोकण | कल्याण | ९९३ | ९९३ | |
| १४ | व्हॅल्युअर फॅबटेक | कोकण | रत्नागिरी | ८०१ | ८०१ | |
| | एकूण | | | २,०९,८०६ | २,०९,८०६ | |

२. महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ यांच्या दिनांक १८.११.२०२२ अन्वये महाराष्ट्र राज्य, व्यवसाय प्रशिक्षण परिषद यांचेकडील सूचीबध्द संस्थांची (Empanelled Assesmet agency) यादी तसेच सूचिबध्द संस्थापैकी ज्या संस्थांना बांधकाम क्षेत्रातील प्रशिक्षणाच्या मूल्यमापनाचा अनुभव आहे अशा संस्थांची यादी सादर केली आहे. तसेच, महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ यांनी मंडळाकडील नोंदीत सक्रीय बांधकाम कामगारांच्या कौशल्य वृध्दीकरण प्रशिक्षणांअती कौशल्य चाचणी करीता महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाची नियुक्ती करण्याबाबत विनंती केली होती.

३. मंडळाच्या दिनांक २१.११.२०२२ रोजीच्या पत्रान्वये कौशल्य विकास योजनेंतर्गत बांधकाम कामगारांच्या प्रशिक्षणाअंती मूल्यमापनाकरीता केंद्र शासनाच्या CSDCI कडे एकूण २८ सूचीबध्द संस्था व महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी यांच्याकडे एकूण ०६ संस्था सूचीबध्द संस्थामधून ई- निविदा पध्दतीने /अभिव्यक्ती स्वारस्य पध्दतीने संस्थेची निवड करणे अथवा महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी यांचेकडील ०६ पैकी किती संस्थांना बांधकाम कामगारांना दिलेल्या कौशल्य विकास प्रशिक्षणाचे मूल्यमापन करण्याकरीता नियुक्त करण्यात यावे असा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला होता.

४.	वरीलप्रमाणे मंडळाकडील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना कौशल्य विकास वृध्दीकरण च्या प्रशिक्षणाच्या लक्ष्यांक निश्चिती, बांधकाम कामगारांच्या प्रशिक्षणाअंती मूल्यमापनाकरीता संस्था नियुक्ती करणेबाबत मंडळस्तरावरून करण्यात आलेली कार्यवाहीस मंडळाने मान्यता प्रदान केली असून सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला आहे.

**ठराव क्र.५९(२)/२०२२ :-**

**(अ) मंडळाकडील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना कौशल्य विकास वृध्दीकरण च्या प्रशिक्षणाच्या लक्ष्यांक निश्चितीबाबत शासनास सादर केलेल्या प्रस्तावाच्या कार्यवाहीस मंडळाची मान्यता.**

**(ब) बांधकाम कामगारांच्या प्रशिक्षणाअंती मूल्यमापनाकरीता संस्था नियुक्ती करणेबाबत शासनास सादर केलेल्या प्रस्तावाच्या कार्यवाहीस मंडळाची मान्यता.**

**ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याण मंडळ, मुंबई

**विषय क्र.०३ :- मंडळाकडील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांकरीता घरकुल योजना म्हाडा, सार्वजनिक खाजगी भागीदारी, बांधकाम कामगारांच्या समूहामार्फत सोसायटीची निर्मितीद्वारे राबविण्यास धोरण निश्चितीस मंजूरी देणे.**

मंडळ सचिव यांनी असे सादर केले की, मंडळामार्फत बांधकाम कामगारांकरीता अटल बांधकाम कामगार आवास योजना (ग्रामीण) व अटल बांधकाम कामगार आवास योजना (शहरी) अशा दोन योजनांची अंमलबजावणी केली जाते.

२. वरीलप्रमाणे योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे होण्याकरीता व अधिकाधिक बांधकाम कामगारांना स्वत:च्या हक्काच्या घरकुलाचा लाभ मिळावा याकरीता बांधकाम कामगारांकरीता घरकुल योजना खालील तीन प्रकारे राबविण्याचे विकल्प मा. अध्यक्ष तथा मंत्री महोदय कामगार विभाग यांना मान्यतेस्तव सादर करण्यात आले होते.

| **अ.** | **म्हाडाकडे उपलब्ध असलेली घरे** |
|---|---|
| i) | संबंधित जिल्हयात म्हाडाकडे किती घरे प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत तयार आहेत याबाबतची माहिती मिळविणे |
| ii) | म्हाडाकडून घरे उपलब्ध झाल्यास रू.२.५ लक्ष प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत रू.२.०० लक्ष अर्थसहाय्य मंडळाकडून व रू.५०,०००/- इतकी रक्कम बांधकाम कामगार स्वत: जमा करेल याप्रमाणे रू.५ लक्ष इतकी रक्कम सदर घरांकरीता म्हाडाकडे जमा करण्यात येईल. |
| iii) | सदर योजनेकरीता इच्छुक बांधकाम कामगार जिल्हा कार्यालयांकडे अर्ज करेल व अर्जासोबत संबंधित कागदपत्रे जमा करेल. सदर कागदपत्रांमध्ये बँकेकडून कर्ज मंजूर झाल्याच्या पत्राचाही समावेश असेल |
| iv) | सदर अर्जाची छाननी संबंधित जिल्हयाचे सरकारी कामगार अधिकारी/ सहाय्यक कामगार आयुक्त करतील व सदर लाभार्थी पात्र झाल्यास जिल्हा कार्यालयाचे अधिकारी त्याबाबत संबंधित बांधकाम कामगारास अवगत करेल व तद्नंतर संबंधित बांधकम कामगार रू.५०,०००/- मंडळ खाती जमा करेल. त्यानंतर संबंधित जिल्हा कार्यालय अधिकारी सदर अर्ज प्रमाणपत्र व शिफारशीसह मंडळ मुख्यालयाकडे पाठवतील |
| v) | सदर यादीस मान्यता देऊन मंडळाचे प्रति लाभार्थी रू.२.०० लक्ष अर्थसहाय्य व कामगारांनी जमा केलेले रू.५०,०००/- या प्रमाणे प्रति लाभार्थी रू.२.५ लक्ष प्रमाणे रक्कम म्हाडा कार्यालयाकडे जमा करेल. म्हाडाकडे जमा करावयाच्या उर्वरित रक्कमेकरीता बांधकाम कामगारांस बँकेकडून कर्ज उपलब्ध करून दयावा लागेल |
| vi) | म्हाडा कार्यालयाने लाभार्थ्यांची यादी प्रदर्शित केल्यावर संबंधित जिल्हयाचे सहाय्यक कामगार आयुक्त व बांधकाम कामगार यांचे संयुक्त प्रमाणपत्र बँकेकडे जमा |

| | |
|---|---|
| | केल्यावर लाभार्थ्यांच्या बँकेकडून रक्कम म्हाडा कार्यालयाच्या खात्यावर जमा करण्यात येईल व तद्नंतर लाभार्थ्यांला घराचा ताबा देण्यात येईल. |
| **ब.** | **सार्वजनिक -खाजगी भागीदारी-** |
| i) | याबाबत गृहनिर्माण विभागाच्या दि.११.०९.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये कार्यवाही अपेक्षित |
| ii) | सदर योजना महाराष्ट्र गृहनिर्माण विकास महामंडळामार्फत राबविण्यात येईल, सबब प्रकल्पांचे अंदाजित मूल्य व रक्कम भागीदारी याबाबत तसेच कार्यपध्दती बाबत धोरण निश्चित करावे लागेल |
| **क.** | **बांधकाम कामगारांच्या समूहामार्फत सोसायटीची निर्मिती**<br>**सदर योजना दोन प्रकारे राबविता येईल** |
| i) | या मध्ये बांधकाम कामगारा वैयक्तिकरित्या स्वत: घर बांधेल व त्याकरीत मंडळाकडून निश्चित अर्थसहाय्य देण्यात येईल. |
| ii) | बांधकाम कामगारांचा समूह एकत्र येऊन गृहनिर्माण सोसायटी नोंदीत करतील त्याअंतर्गत भूखंड खरेदी करून जागेच्या किंमतीसह घर बांधणीचा खर्च निश्चित करतील. स्वत:कडील रक्कमेने सदर जागेवर घराचे बांधकाम करायला सुरूवात करतील ५०% घराचे बांधकाम झाल्यावर उर्वरित ५०% रक्कम मिळण्याकरीता जिल्हा कार्यालयामार्फत मंडळाकडे प्रस्ताव सादर करतील |

३. वरीलप्रमाणे मा.मंत्री (कामगार) तथा मा. अध्यक्ष यांना सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता प्रदान करून सदरचा प्रस्ताव मा. प्रधान सचिव, कामगार यांचेमार्फत सादर करण्याचे निर्देश दिले होते त्या अनुषंगाने दिनांक २१.११.२०२२ अन्वये प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात आला आहे.

४. सदर विषयाबाबत चर्चा करताना मा.कामगार आयुक्त यांनी अनुसूचीत जाती व अनुसूचीत जमातीकरीता घरे उपलब्ध होत असून त्याबाबत मंडळाकडून कार्यवाही करावी असे मत व्यक्त केले. मा.मंत्री (कामगार) तथा मा. अध्यक्ष यांनी बांधकाम कामगारांची संगणक प्रणालीमध्ये अशा पद्धतीची वर्गवारी आहे का हे तपासून, अनुसूचीत जाती व अनुसूचीत जमातीकरीता निहाय तपशिल सादर करण्याच्या सूचना केल्या.

सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र.५९(३)/२०२२ :- मंडळांतर्गत नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांकरीता घरकुल योजना म्हाडा, सार्वजनिक खाजगी भागीदारी, बांधकाम कामगारांच्या समूहामार्फत सोसायटीची निर्मितीद्वारे राबविण्याच्या धोरण निश्चितीबाबत मंडळाने शासनास सादर केलेल्या प्रस्तावाच्या कार्यवाहीस मंडळाची मान्यता.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याण मंडळ, मुंबई

**विषय क्र.०४ :- मंडळाकडील नोंदणी व विविध कल्याणकारी योजनांची जनजागृती करण्यासाठी प्रसार प्रसिध्दीच्या माध्यम आराखडा रू.३० कोटी वरून रू.१०० कोटी करण्याच्या सुधारित प्रसार प्रसिध्दी माध्यम आराखडयास मंजूरी देणे व सन २०२३-२४ चा नवीन प्रसार प्रसिध्दी माध्यम आराखडा तयार करण्यास मंजूरी देणे.**

मंडळ सचिव यांनी सादर केले की, मंडळाकडील बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व विविध कल्याणकारी योजनांचा प्रसार, प्रसिध्दि व जनजागृती प्रसिध्दी आराखडा या खर्च बाबीकरीता सन २०२२ -२०२३ चे मंजूर अर्थसंकल्पीय तरतूद रू ३०.०० कोटी मध्ये वाढ करून रू. १००.०० कोटी इतका सुधारीत तरतुदीस मा.मंत्री (कामगार) तथा अध्यक्ष यांनी मंजूरी प्रदान केली होती त्या अनुषंगाने सुधारित आराखडा शासन मान्यतेस खालीलप्रमाणे सादर करण्यात आला आहे.

| अ.क्र. | मंडळाकडील बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व विविध कल्याणकारी योजनांचा प्रसार, प्रसिध्दि व जनजागृतीची माध्यमे | सन २०२२-२०२३ मंजूर अर्थसंकल्पिय तरतूद (रु.कोटी) | सन २०२२-२३ चे सुधारीत तरतूद (रु.कोटी) |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | MSRTC Panels | ३.०० | १०.०० |
| २ | Hoardings- All types | ६.०० | १०.०० |
| ३ | Bus Queue Shelters (in Mumbai) | २.०० | ३.०० |
| ४ | MSRTC announcements at Bus Stands | २.०० | १०.०० |
| ५ | Documentary Production | ०.१० | ४.०० |
| ६ | Radio Spot & jingle Production | ०.१६ | १.०० |
| ७ | Mobile LED Van for Promotion | २.०० | १०.०० |
| ८ | Print | ४.०० | १.०० |
| ९ | TV Media | ३.५० | १.०० |
| १० | Electronic Sing Board | २.५४ | ५.०० |

| अ.क्र. | मंडळाकडील बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व विविध कल्याणकारी योजनांचा प्रसार, प्रसिध्दी व जनजागृतीची माध्यमे | सन २०२२-२०२३ मंजूर अर्थसंकल्पिय तरतूद (रु.कोटी) | सन २०२२-२३ चे सुधारीत तरतूद (रु.कोटी) |
|---|---|---|---|
| ११ | Social Media | ०.१० | १०.०० |
| १२ | Radio | १.०० | १.०० |
| १३ | TV Creative Production | ०.६० | ६.०० |
| १४ | Best/TMC/NMMC/other Muncipal Corporation Panells | ३.०० | ३.०० |
| १५. | Campaigns (Registration and Schemes) कलापथक, पथनाट्य, चित्ररथ | -- | १०.०० |
| १६ | Mobile Kiosks | -- | ६.०० |
| १७ | Cable Advertising | -- | ९.०० |
| **एकूण** | | ३०.०० | १००.०० |

२. तसेच, सदर बैठकीत मंडळाच्या सन २०२३- २०२४ करीता रक्कम रू.१०० कोटीचा आराखडा तयार करण्याच्या विचार-विनिमिया करीता प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

३. सदर विषयाबाबत मा मा.मंत्री (कामगार) तथा अध्यक्ष यांनी केबल जाहिरात प्रसारण माध्यमाच्या बाबतीत तरतूद कमी करून आराखडा सुधारित करण्याबाबत निर्देश दिले.सदर आराखडयात सुधारणा केल्यानंतर सुधारित आराखडा मान्यतेस सादर करावा असे निर्देश दिले. सदर प्रचार व प्रसिध्दीच्या आराखडयात सुधारणा करण्याचे सर्व अधिकार मा मा.मंत्री (कामगार) तथा अध्यक्ष यांना सर्वानुमते प्रदान करण्यात आले.

सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र.५९ (४)/२०२२**

**बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व विविध कल्याणकारी योजनांचा प्रसार, प्रसिध्दी व जनजागृती बाबत शासन मान्यतेस सादर करण्यात आलेल्या आराखडयात सुधारणा असल्याने मा.मंत्री (कामगार) तथा अध्यक्ष यांच्या निर्देशान्वये सुधारणा करण्यात यावे व सुधारणा झाल्यानंतर प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात यावा असे निर्देश देण्यात आले. तसेच, बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व विविध कल्याणकारी योजनांचा प्रसार, प्रसिध्दी व जनजागृती च्या सन २०२२-२०२३ करीता रू.१०० कोटीच्या खर्चास**

मंडळाने तत्वत: मान्यता प्रदान केली. मंडळाच्या सन २०२३-२४ करीता रक्कम रू.१०० कोटीचा आराखडा  तयार करण्यास मान्यता प्रदान केली, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याण मंडळ, मुंबई

**विषय क्र.०५ :- राज्यातील महानगरपालिका/ नगरपालिका क्षेत्रात बांधकाम कामगारांकरीता नाक्याच्या ठिकाणी शेड उभारणे योजना राबविणेबाबत मंजूरी देणे.**

मंडळ सचिव यांनी असे सादर केले की, मा. अध्यक्ष तथा मंत्री महोदय, कामगार यांच्या अध्यक्षतेखालील दि.१३.०९.२०२२ रोजी झालेल्या आढावा बैठकीत बांधकाम कामगार नोंदणी, नुतनीकरण व लाभ वाटपाबाबत आढावा घेताना मा. मंत्री महोदय यांनी नाक्यावरील बांधकाम कामगारांची नोंदणी करण्याचे निर्देश दिलेले आहेत तसेच, सदर नाक्यावरील बांधकाम कामगारांच्या सुविधेकरीता नाक्याच्या ठिकाणी बांधकाम कामगारांचे ऊन-पाऊस यांच्यापासून संरक्षणाकरीता शेड बांधण्यात यावी व त्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्या अनुषंगाने जिल्हयातील कार्यक्षेत्रातील नाक्याच्या ठिकाणे, तेथील अंदाजित बांधकाम कामगारांची संख्या याची माहिती सादर करणेबाबत जिल्हा कार्यालयांना कळविण्यात आले आहे.

२. मा. मंत्री (कामगार) तथा मा.अध्यक्ष यांनी दि.२७.०९.२०२२ रोजीच्या पत्रान्वये, सर्व जिल्हा कार्यालयांनी जिल्हयातील संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाशी संपर्क साधून नाक्याच्या ठिकाणी शेड बांधण्याकरीता जागा उपलब्ध करणेबाबत कार्यवाही करून, जागा उपलब्धतेबाबतचा अहवाल सचिव तथा मुख्य कार्यकारी यांना एक महिन्याच्या कालावधीत पाठविण्याबातचे निर्देश कामगार आयुक्त यांच्या स्तरावरून क्षेत्रिय अधिकाऱ्यांना देण्यात यावेत. त्यानंतर, जागांच्या उपलब्धतेबाबतचा एकत्रित अहवाल सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी शासनास सादर करावा अशा सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्या अनुषंगाने अहवाल सादर करण्याबाबत मंडळाच्या दि.१०.११.२०२२ रोजीच्या पत्रान्वये सर्व जिल्हा कार्यालयांना कळविण्यात आले आहे. त्याबाबत मंडळ सचिवांनी सादर केले की, जिल्हा कार्यालयामार्फत माहिती प्राप्त होताच अहवाल सादर करण्यात येईल.

३. महानगरपालिका / नगरपालिका / नगरपंचायत यांच्याकडून जागेचा तपशील प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्यास मंडळाने मान्यता प्रदान केली.

सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र.५९(५)/२०२२ :-**

**राज्यातील महानगरपालिका/ नगरपालिका क्षेत्रात बांधकाम कामगारांकरीता नाक्याच्या ठिकाणी तात्पुरत्या स्वरूपात शेड उभारणे या योजनेस मंडळाने तत्वत: मान्यता प्रदान केली असून, महानगरपालिका / नगरपालिका / नगरपंचायत यांच्याकडून जागेचा तपशील प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्याबाबतचा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याण मंडळ, मुंबई

**विषय क्र.०६ :- मंडळातील मुख्यालय व अधिनस्त जिल्हा कार्यालयाच्या अभिलेख कक्षाचे अद्यावतीकरणांतर्गत कॉपेक्टर स्टोरेज व अभिलेख स्कॅनिंग ॲण्ड डिजिटायझेशन करून घेणेचे कामास मंजूरी देणे.**

मंडळ सचिव यांनी असे सादर केले की, मा.आ.श्री.भरतशेठ गोगावले (विधानसभा सदस्य) यांच्याकडून प्राप्त झालेल्या दिनांक ०२.११.२०२२ रोजीच्या पत्रानुसार मा. मंत्री (कामगार)यांनी दिलेल्या निर्देशान्वये राज्यातील कामगार विभागाच्या कार्यालयातील अभिलेख अस्ताव्यस्त अवस्थेत आहेत, तरी ते सुस्थितीत स्कॅनिंग करून डिजिटल कॉपेक्टरमध्ये जतन करून ठेवण्यात यावे, असे नमूद आहे.

२. राज्यातील कामगार विभागाच्या कार्यालयातील अभिलेख अस्ताव्यस्त अवस्थेत आहेत, तरी ते सुस्थितीत स्कॅनिंग करून डिजिटल कॉपेक्टरमध्ये जतन करून ठेवण्याबाबत प्रस्ताव मा.मंत्री (कामगार) तथा अध्यक्ष यांना मान्यतेस्तव सादर करण्यात आला होता. मुख्यालय स्तरावर, विभागीय व जिल्हा कार्यालय स्तरावर जतन करून ठेवण्यात आलेले अभिलेख स्कॅनिंग करून डिजीटल कॉपेक्टरमध्ये जतन करून ठेवण्यातबाबत ई- निविदा पध्दतीने कार्यवाही करणेबाबतच्या प्रस्तावास मा मा.मंत्री (कामगार) तथा अध्यक्ष यांनी मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

३. मा.मंत्री (कामगार) तथा अध्यक्ष यांनी दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने स्थानापन्न संचालक शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय पुणे यांना तांत्रिक मान्यता व माहिती मिळणेबाबत मंडळाच्या दिनांक १८.११.२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. त्याअनुषंगाने स्थानापन्न संचालक शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय पुणे यांनी त्यांच्या दिनांक १९.११.२०२२ रोजीच्या पत्रान्वये तांत्रिक मान्यता देण्यात आली आहे.

४. स्थानापन्न संचालक शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय पुणे यांच्या दिनांक १९.११.२०२२ रोजीच्या पत्रात कळविलेल्या निकषाच्या अनुषंगाने, जिल्हा सुविधा केंद्रात अभिलेख कक्ष अद्यावतीकरणास उपलब्ध जागेत कॉंपेक्टर स्टोअरेज व स्कॅनिंग ॲण्ड डिजिटायझेशन करण्याबाबत कार्यालय निहाय उपलब्ध अभिलेख कक्षाची जागा व अभिलेख व्याप्ती लक्षात घेऊन कॉम्पेक्टरची संख्या निश्चित करावी व या कार्यालयास मागणी तात्काळ कळविण्याबाबत सर्व जिल्हा कार्यालयांना कळविण्यात आले आहे.

५. याबाबत मा.मंत्री (कामगार) तथा मा.अध्यक्ष व मा. प्रधान सचिव, कामगार यांनी मुख्यालय व जिल्हा कार्यालयातील अभिलेख सुस्थितीत स्कॅनिंग करून डिजिटल कॉपेक्टरमध्ये जतन करून ठेवण्याबाबत आवश्यक असल्याचे मत नोंदविले त्यास मंडळाने मान्यता प्रदान केली.

सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव क्र.५९(६)/२०२१ :-

मंडळातील मुख्यालय व अधिनस्त जिल्हा कार्यालयाच्या अभिलेख कक्षाचे अद्यावतीकरणांतर्गत कॉपेक्टर स्टोरेज व अभिलेख स्कॅनिंग ॲण्ड डिजिटायझेशन करून घेणेबाबतच्या मंडळाच्या योजनेस मान्यता प्रदान करण्याबाबतचा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याण मंडळ, मुंबई

**विषय क्र.०७ :- मंडळातील बांधकाम कामगारांच्या तक्रारींचे निवारण करण्याकरीता हेल्पलाईन सेवा राज्यस्तरावर ०१ व विभाग स्तरावर ०६ ठिकाणी कार्यन्वित करण्याच्या धोरण निश्चितीस मंजूरी देणे.**

मंडळ सचिव यांनी असे सादर केले की, मा. मंत्री (कामगार) तथा मा.अध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखालील दिनांक १३.०७.२०२० रोजी संपन्न मंडळाच्या ५५ व्या बैठकीत कोविड-१९ या विषाणूच्या प्रादुर्भाव कालावधीत करावयाच्या नोंदणी, नुतनीकरण व लाभवाटपाच्या कार्यपध्दतीबाबत सादर विषयावर सविस्तर चर्चेअंती सदर कालावधीत बांधकाम कामगारांची नोंदणी/ नुतनीकरण/ लाभ वाटपाकरीता कार्यालयामध्ये गर्दी होऊन विषाणूचा प्रसार अधिक वेगाने होऊ नये याकरीता ऑनलाईन पध्दतीने नोंदणी, नुतनीकरण व लाभवाटपाची कार्यवाही करण्याचा निर्णय मंडळ बैठकीत घेण्यात आला होता.

२. बांधकाम कामगारांच्या तक्रारीचे निवारण करण्याकरीता हेल्पलाईन सेवा कार्यन्वित करणेबाबत मा. मंत्री (कामगार) तथा मा.अध्यक्ष यांना प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावास मा. मंत्री (कामगार) तथा मा.अध्यक्ष यांनी मान्यता प्रदान केली असून शासन मान्यतेस प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. शासन मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

३. सदर विषयाबाबत मा. कामगार आयुक्त यांनी असे मत मांडले की, मंडळातील बांधकाम कामगारांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी एकच क्रमांक घेण्यात यावा त्याकरीता वेगळया वेगळया लाईन्स घेण्यात याव्यात असे प्रस्तावित केले. त्यास मंडळाने मान्यता प्रदान केली.

**ठराव क्र.५९ (७)/२०२२ :-**

**मंडळातील बांधकाम कामगारांच्या तक्रारींचे निवारण करण्याकरीता हेल्पलाईन सेवा करीता एकच क्रमांक घेण्यात यावा व त्याकरीता वेगळया वेगळया लाईन्स घेण्यात याव्यात असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याण मंडळ, मुंबई

**विषय क्र.०८ :- बांधकाम कामगारांच्या नोंदणी व नुतनीकरणातील तांत्रिक अडचणी कमी करून नोंदणी नुतनीकरणामध्ये वाढ करण्याच्या अनुषंगाने बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण शुल्काची रक्कम रू.०१/- इतकी ठेवणे, नोंदणी/ नुतनीकरणाचा अर्ज ज्या दिनांकास मंजूर करण्यात येईल त्या दिनांकापासून वैधता ०१ वर्ष ठेवणे, लॉगइन आयडी वाढवून देणे व IWBMS संगणक प्रणाली लॉगिन आयडी मध्ये एकावेळी ५० अर्ज दिसतील अशी सुधारणा करणे इत्यादी धोरणात्मक निर्णयास मंजूरी देणे.**

मंडळ सचिव यांनी असे सादर केले की, मा. मंत्री (कामगार) तथा मा.अध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखालील दिनांक १३.०९.२०२२ व दिनांक २७.०९.२०२२ रोजीच्या बैठकीत बांधकाम कामगारांची नोंदणी वाढविणेबाबत निर्देश देण्यात आले होते. त्या अनुषंगाने शासनाच्या दिनांक ०९.११.२०२२ रोजीच्या पत्रान्वये बांधकाम कामगारांच्या नोंदणी व नुतनीकरणातील तांत्रिक अडचणी कमी करून नोंदणी व नुतनीकरणामध्ये वाढ करण्याच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे निर्देश प्राप्त झालेले आहेत.

| | |
|---|---|
| i) | इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ मधील कलम १२ (३) मध्ये नोंदणी शुल्काबाबतची तरतूद आहे. बांधकाम कामगारांची नोंदणी/ नुतनीकरण करण्याच्या शुल्काच्या सद्यस्थितीतील रक्कमेत बदल करून सदर शुल्काची रू.०१/- इतकी ठेवावी. |
| ii) | बांधकाम कामगाराचा नोंदणी/ नुतनीकरण अर्ज ज्या दिनांकास मंजूर करण्यात येईल त्या दिनांकापासून नोंदणी/ नुतनीकरणाची वैधता एका वर्षाची ठेवण्यात यावी. |
| iii) | नोंदणी अधिकाऱ्याच्या कार्यालयातील लिपीकांना आवश्यकतेनुसार लॉग इन आयडी वाढवून देण्याची कार्यवाही सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांच्या मान्यतेने करण्यात यावी. |
| iv) | IWBMS संगणक प्रणालीमधील लॉग इन आयडी मध्ये एकावेळी ५० अर्ज दिसतील अशी सुधारणा करण्यात यावी. |
| v) | बांधकाम कामगाराच्या नोंदणी/ नुतनीकरणासाठीच्या अर्जासोबत सादर केलेल्या माहितीबाबत स्पष्टीकरणाकरीता (Clarification) बांधकाम कामगाराकडे परत पाठविण्यात आलेल्या अर्जाच्या बाबतीत संबंधित बांधकाम कामगाराने ०७ दिवसात स्पष्टीकरण सादर करावे. बांधकाम कामगारांकडून विहीत मुदतीत स्पष्टीकरण प्राप्त न झाल्यास सदरचा अर्ज फेटाळण्यात यावा. याबाबत संबधित कामगारास मोबाईलवर एस.एम.एस. पाठविण्याची कार्यवाही करण्यात यावी. |
| vi) | बांधकाम कामगारांच्या नोंदणी व नुतनीकरणासाठी जिल्हा सुविधा केंद्र निहाय आवश्यक मनुष्यबळ पुरविणेबाबत मे. आय.टी. आय. प्रा.लि. व मे. आरसीएस इन्फो |

| | |
|---|---|
| | प्रा.लि. या संस्थांना कळविण्यात यावे. परंतु, या कामासाठी सदर संस्थेसोबत केलेल्या करारामध्ये नमूद केलेल्या मनुष्यबळापेक्षा अतिरिक्त मनुष्यबळ लावावे लागत असल्यास त्याबाबत कोणताही अतिरिक्त आर्थिक भार मंडळावर येणार नाही, याची दक्षत घ्यावी. |
| vii) | बांधकाम कामगारांचे प्रलंबित नोंदणी/ नुतनीकरणाबाबतचे अर्ज दि.१५ डिसेंबर, २०२२ पर्यंत तातडीने निकाली काढण्याबाबत सर्व नोंदणी अधिकारी यांना सूचना देण्यात याव्यात. |

२. वरीलप्रमाणे दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याबाबत मंडळाच्या दिनांक ०९.११.२०२२ रोजीच्या पत्रान्वये सर्व क्षेत्रिय कार्यालये व मे. आर.सी.एस. इन्फो प्रा.लि व मे. आयटीआय लिमिटेड प्रा.लि. यांना कळविण्यात आलेले आहे.

सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला आहे.

**ठराव क्र.५९(८)/२०२२ :-**

**बांधकाम कामगारांच्या नोंदणी व नुतनीकरणातील तांत्रिक अडचणी कमी करून नोंदणी नुतनीकरणामध्ये वाढ करण्याच्या अनुषंगाने बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण शुल्काची रक्कम रू.०१/- इतकी ठेवणे, नोंदणी/ नुतनीकरणाचा अर्ज ज्या दिनांकास मंजूर करण्यात येईल त्या दिनांकापासून वैधता ०१ वर्ष ठेवणे, लॉगइन आयडी वाढवून देणे व IWBMS संगणक प्रणाली लॉगिन आयडी मध्ये एकावेळी ५० अर्ज दिसतील अशी सुधारणा करणे व इतर उपाययोजनाबाबत मंडळामार्फत केलेल्या कार्यवाहीस मान्यता देण्याचा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याण मंडळ, मुंबई

**विषय क्र.०९ :-** **मंडळाचे मा. अध्यक्ष तथा मंत्री महोदय, कामगार विभाग यांचेकरीता वाहन खरेदीस मंजूरी देणे व मा.मंत्री कार्यालय (कामगार) यांचेकरीता दोन वाहने भाडयाने घेणेबाबत, मंडळ मुख्यालय व क्षेत्रिय कार्यालयांसाठी आवश्यकतेनुसार वाहने भाडयाने घेण्यास मुदतवाढ देणे.**

याबाबत मंडळ सचिवांनी सादर केले की,

**(अ)** मा. मंत्री (कामगार) हे महाराष्ट्र इमारत इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई या मंडळाचे अध्यक्ष आहेत. मंडळाचे कार्यक्षेत्र संपूर्ण राज्यभर असल्यामुळे मंडळाचे अध्यक्ष यांना कामकाजाचा आढावा व अनुषंगिक कार्यक्रमाकरीता विविध जिल्हयांना भेटी व लांब पल्यांचे दौरे/ प्रवास करणे क्रमप्राप्त असल्यामुळे मा. अध्यक्षांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने नवीन वाहन खरेदी आवश्यक आहे. त्यासाठी MG Gloster हे अत्याधुनिक वाहन खरेदी करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

२. मा. मंत्री (कामगार) यांचेकडील इनोव्हा क्रिस्टा हे वाहन सन २०१५ मध्ये मंडळामार्फत खरेदी करण्यात आले असून सदरचे वाहन वारंवार नादुरूस्त होत आहे.

३. वरील बाबींच्या अनुषंगाने मे. क्रिशीव ॲटो एजन्सीज प्रा.लि. यांनी MG GLOSTER SAVVY ६ SEATER BS६ ४X४ करीता दराचा तपशील सादर केला असून ते पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | वाहनाचे नाव मेक मॉडेल | तपशील | रक्कम रू. |
|---|---|---|---|
| १. | MG GLOSTER SAVVY ६ SEATER BS६, ४X४ | Invoice | ४०,७७,८०० |
| | | १% TCS | ४०,७७८ |
| | | Registration- Company | ८,३६,८५१ |
| | | Insurance Elite | १,७९,४५० |
| | | Essential Kit | १२,७२० |
| | | Fast Tag | ५,०० |
| | | **On Road Price Rs.** | **५१,४८,०९९/-** |

४. मा. अध्यक्ष तथा मंत्री महोदय, कामगार यांच्या मान्यतेनुसार MG GLOSTER SAVVY ६ SEATER BS६ ४X४ हे वाहन रू.५१,४८,०९९/- मर्यादेत मंडळाच्या उपकर निधीमधून वाहन खरेदी करण्याबाबतचा प्रस्ताव विशेष बाब म्हणून शासन मान्यतेस्तव दिनांक १७.१०.२०२२ रोजी सादर करण्यात आलेला आहे.

**(ब)** मा. मंत्री (कामगार) तथा मा. अध्यक्ष यांचे कार्यालयातील प्रशासकीय कामकाजाकरीता मा.मंत्री कार्यालयाकडील दि. ०२.०९.२०२२ रोजीच्या पत्रान्वये १ इनोव्हा

कार आणि १ स्विफ्ट कार अशी २ वाहने उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार दोन वाहने भाडे तत्त्वावर घेणे आवश्यक आहे.

२. मंडळ मुख्यालयातील प्रशासकीय दौरे,मंत्रालयीन कामकाज इ. साठी एक मारुती एर्टिगा कार हे वाहन शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग दिनांक १०.०८.२०२० मधील पुरवठादाराचे नामिका (Panel )वरील शासनमान्य पुरवठादार मे.संजय ट्रॅव्हल्स,मुंबई या खाजगी पुरवठादाराकडून करारनाम्याद्वारे मंजूरी देण्यात आली असून त्यानुसार मंडळ मुख्यालयातील कार्यालयीन कामकाजाकरिता एक मारुती एर्टिगा अथवा तत्सम प्रकारचे वाहन मासिक भाडेतत्त्वावर घेण्यासाठी दिनांक ०१.११.२०२२ पासून पुढील एक वर्षाचे कालावधीसाठी मंजूरी देणे आवश्यक आहे.

३. मंडळाच्या विविध कल्याणकारी योजनांच्या अंमलबजावणी व प्रसार प्रसिध्दीकरीता विभाग आणि जिल्हा क्षेत्रिय कार्यालयांना वाहन उपलब्ध करून देणे आवश्यक असल्याने मंडळाच्या दिनांक ०४.०९.२०१९ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र ५२(०९)/२०१९, अन्वये कामगार आयुक्त कार्यालयाअंतर्गत ४४ विभाग/ जिल्हा कार्यालयांपैकी ज्या विभाग/ जिल्हा कार्यालयातील अधिका-यांची पदे भरलेली आहेत त्या अधिका-यांना मंडळाच्या कामकाजासाठी बोलेरो/ स्कॉर्पियो अथवा तत्सम प्रकारचे वाहन मासिक भाडेतत्त्वावर वाहन उपलब्ध करून देण्यास मान्यता प्रदान करण्यात आली आहे. त्यानुसार मंडळाचे पत्र दिनांक २७.०९.२०१९ अन्वये संबंधित विभाग/ जिल्हा कार्यालयांतील अधिका-यांना वाहने भाडेतत्त्वावर घेण्याची कार्यपध्दती व वापराबाबत सर्वसमावेशक मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

४. विभाग/जिल्हानिहाय वाहन-प्रकारामध्ये एकवाक्यता येणेचे व मंडळाचे खर्चामध्ये काटकसर होणेचे दृष्टीने यापुढे मंडळाचे दिनांक 04.09.2019 चे बैठकीतील ठराव क्र .52(9) /2019 नुसार बोलेरो /स्कॉर्पियो हि वाहने अथवा तत्सम वाहने यामध्ये सुधारणा करून त्याऐवजी वाहन-प्रकारामध्ये बोलेरो/ स्विफ्ट -डिझायर/ मारूती एर्टिगा यापैकी एक वाहन जिल्ह्याचे भौगोलिक परिस्थितीचा विचार करून वाहन भाडेतत्वावर घ्यावे.

५. सद्या ज्या विभाग /जिल्हा कार्यालयांकडे वाहन उपलब्ध नाही अशा नव्याने वाहन भाडेतत्त्वावर उपलब्ध करून देण्याची मागणी करणा-या प्रस्तावांना वरीलप्रमाणे प्रस्तावित केलेल्या वाहनापैकी स्पर्धात्मक दराद्वारे विहीत खरेदी प्रक्रियेचा अवलंब करून किफायतशीर दराने संबंधित जिल्हयाच्या प्रादेशिक परीवहन प्राधिकरणाने (RTA) यांनी निश्चित केलेल्या दराचे मर्यादेत १ वर्षाचे कालावधीकरीता आणि लॉग-बुक नोंदी प्रमाणिकरण करणेचे अटींना अधिन राहून मान्यता मिळणे आवश्यक आहे.

६. तसेच, ज्या कार्यालयांनी त्यांचेकडील भाडेतत्त्वावर घेतलेल्या वाहन करारनाम्याची मुदत संपल्याने मुदतवाढीची मागणी केली आहे अशा कार्यालयांना वरील नमूद अटी शर्थींना अधीन राहून मुदतवाढ देणे आवश्यक आहे.

७. मंडळ सदस्य मा. कामगार आयुक्त यांनी मंडळाचे सदस्य असलेले मा.प्रधान सचिव (कामगार) आणि इतर शासकीय सदस्य यांना मंडळाच्या विविध कल्याणकारी योजनांचा

आढावा व अनुषंगिक कामकाजचे लांब पल्ल्याच्या दौ-यांसाठी कार्यालयीन कामकाजाकरीता भाडेतत्त्वावर वाहन उपलब्ध करून देणे आवश्यक असल्याची मागणी केली.सदर मागणीस मा.मंत्री (कामगार) तथा मा.अध्यक्ष यांनी सहमती दर्शविली.

याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र. ५९(९)/२०२२:-**

**(अ) मा.मंत्री (कामगार) तथा मा. अध्यक्ष यांचेकरीता वाहन खरेदीबाबत मंडळामार्फत करण्यात आलेल्या कार्यवाहीस मंडळाची मान्यता.**

**(ब) मा.मंत्री कार्यालय (कामगार) यांचेकरीता दोन वाहने भाडयाने घेणे, मंडळ मुख्यालय व क्षेत्रिय कार्यालयांसाठी आवश्यकतेनुसार १ वर्षाकरीता वाहने भाडयाने घेण्यास मंडळाची मान्यता.**

**(क) मंडळाच्या शासकीय सदस्य यांना लांब पल्ल्याच्या दौ-यांसाठी तसेच, कार्यालयीन कामकाजाकरीता भाडेतत्त्वावर वाहन उपलब्ध करून देण्यास मंडळाची मान्यता.**

**उपरोक्त ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला आहे.**

**सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम**
**कामगार कल्याणकारी मंडळ,**
**मुंबई**

**अध्यक्ष**
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याण मंडळ, मुंबई

**विषय क्र.१० :- मंडळाच्या बैठका आयोजित करण्यासाठी मंत्रालय परिसरात कार्यालयीन जागा भाडयाने घेण्याबाबत, मंडळ मुख्यालयासाठी कायमस्वरूपी कार्यालयीन जागा व इमारत बांधकामास मंजूरी देणे.**

मंडळ सचिव यांनी असे सादर केले की, मा. प्रधान सचिव (कामगार) व कामगार विभागाचे मंत्रालयीन अधिकारी यांचेसमवेत मा. मंत्री (कामगार) यांच्या निर्देशानुसार बैठका आयोजित केल्या जातात. त्या अनुषंगाने मंत्रालयाच्या जवळपास मंडळाच्या बैठका आयोजित करण्यासाठी भाडेतत्वावर जागा उपलब्ध करून घेण्याबाबत दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने, सर्वात कमी दर असलेल्या जॉली मेकर ०१ प्रिमायसेस कॉ. हॉ. सोसायटी लि. ०८ वा मजला नरीमन भवन प्रिमायसेस येथे कार्यालयीन जागा भाडयाने घेण्यास मा.मंत्री (कामगार) तथा मा. अध्यक्ष यांनी मान्यता प्रदान केली. सदर मान्यतेच्या अनुषंगाने शासन मान्यतेस प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. शासन मान्यतेअंती पुढील कार्यवाही प्रस्तावित आहे. जॉली मेकर, ०१ प्रिमायसेस कॉ. ऑप. हॉसिंग सोसायटी लिमिटेड येथील क्षेत्रफळ १५६० चौ. फूट २४०+ GST बाबत वाजवी दर प्रमाणपत्र मिळण्याबाबत कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांना प्रमाणपत्र सादर करणेबाबत कळविण्यात आले आहे. सदरचे वाजवी दर प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही प्रस्तावित आहे.

२. सदर विषयाबाबत मा.मंत्री (कामगार) तथा मा. अध्यक्ष यांनी जॉली मेकर, ०१ प्रिमायसेस कॉ. ऑप. हॉसिंग सोसायटी लिमिटेड येथील क्षेत्रफळ १५६० चौ. फूट २४०+ GST बाबत वाजवी दर प्रमाणपत्र त्वरीत प्राप्त करण्यात यावे व सदर जागामालकासोबत करारनामा करून कार्यालय स्थापनेची कार्यवाही करण्यात यावी, असे निर्देश देण्यात आले.

३. मंडळ मुख्यालयातील भाडे खर्चाचे प्रमाण पाहता मंडळाचे मुख्यालयाकरीता स्वत:ची जागा घेऊन इमारत बांधण्याबाबत मंडळ सचिवांनी मत व्यक्त केले. त्याबाबत मा. कामगार आयुक्त, यांनी सिडकोचा एक प्लॉट खरेदी करून मंडळ मुख्यालयाची इमारत उभारण्याबाबत विचारविनिमय व्हावा असे प्रस्तावित केले. सदर प्रस्तावास मंडळाने मान्यता प्रदान केली आहे.

सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र.५९ (१०)/२०२२ :-**

**(अ) मा.मंत्री (कामगार) तथा मा. अध्यक्ष यांचेकरीता मंडळाच्या बैठका आयोजित करण्यासाठी मंत्रालय परिसरात कार्यालयीन जागा भाडयाने घेण्याबाबत शासनास सदर करण्यात आलेल्या प्रस्तावास मंडळाची मान्यता.**

**(ब) मंडळ मुख्यालयाकरीता सिडकोद्वारे सुयोग्य ठिकाणी प्लॉट खरेदी करून मंडळ मुख्यालयाच्या इमारतीचे बांधकाम करण्यात यावे.**

**उपरोक्त ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याण मंडळ, मुंबई

**विषय क्र.११ :- मंडळांतर्गत नोंदीत बांधकाम कामगारांना विविध कल्याणकारी योजनेंतर्गत थेट लाभ हस्तांतरण (DBT) द्वारे लाभ वाटपासाठी स्वतंत्र बँक खाते उघडण्यास मंजूरी देणे.**

मंडळ सचिव यांनी सादर केले की, मंडळाच्या उपकराचे व इतर बाबींचे जमेकरीता बँक ऑफ महाराष्ट्र, युनियन बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ इंडिया, सेंन्ट्रल बँक ऑफ इंडिया, या बँका मध्ये खाते उघडण्यात आलेले आहेत तसेच सेंन्ट्रल बँक ऑफ इंडिया मधील खाते क्र 3722416269 हे मंडळाच्या खर्च विषयक आर्थिक व्यवहाराकरीता वापरण्यात येत आहे.

२. सेंट्रल बँकेच्या खातेवरून मंडळाकडील नोंदीत (सक्रीय (बांधकाम कामगारांना ऑनलाईन पध्दतीने विविध कल्याणकारी योजनांतर्गत (DIRECT BENEFIT TRANSFER) थेट लाभ हस्तांतरण पध्दतीने लाभ वाटप करण्यात येत आहे सदर लाभ . वाटपानंतर बँकेमार्फत प्राप्त अहवालामध्ये अनेक तांत्रिक त्रुटी आढळून येत आहेत तसेच सदर प्राप्त अहवालामध्ये योजनेचा लाभ त्यांच्या बँक खात्यामध्ये यशस्वीपणे जमा झाला आहे किंवा नाही याचे अहवाल वेळेवर प्राप्त होत नाहीत, लाभार्थींच्या खात्यात विलंबाने रक्कम जमा करणे, त्रुटीपूर्ण व विसंगत अहवाल सादर करणे इत्यादी कारणांमुळे मंडळाच्या लेखांकन कामकाजात दैनंदिन अडचणी येत आहेत. याबाबत वारंवार सूचना व पाठपुरवठा करूनही सेंन्ट्रल बँक ऑफ इंडिया यांचेकडून सुधारणा झाली नाही.

३. मंडळाकडील नोंदीत जिवीत बांधकाम कामगारांना ऑनलाईन पध्दतीने विविध कल्याणकारी योजनांतर्गत (DIRECT BENEFIT TRANSFER) थेट लाभ हस्तांतरण पध्दतीने लाभ वाटपाच्या कार्यपध्दतीबाबत दि. ०५.०८.२०२२ रोजी विविध राष्ट्रीयकृत बॅका व खाजगी बॅकांना उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. त्या अनुषंगाने बॅक ऑफ महाराष्ट्र, युनियन बँक व एच. डी. एफ. सी. बॅक, कॅनरा बँक, बँक ऑफ इंडिया, अॅक्सीस बँक इत्यादी बँकांचे प्रस्ताव प्राप्त झाले होते. त्यास अनुसरून संबंधित बँकांना सादरीकरण करण्यासाठी कळविले होते. त्यानुसार बँक ऑफ महाराष्ट्र, युनियन बँक ऑफ इंडिया यांना Test & Trail Base साठीच्या कार्यवाही करिता डेटा पुरविण्यात आला होता व संबंधित बँकांनी आपले यशस्वी प्रदाने व इतर प्रदानाबाबत अयशस्वी प्रदान होणेबाबतची कारणे नमूद करून सविस्तर अहवाल मंडळास सादर केला होता.याबाबत बँक निहाय प्राप्त प्रस्तावांचे अवलोकन होऊन मे. एच.डी.एफ.सी. बँकेचा DBT द्वारे होणाऱ्या अनुदान वितरणाचा चाचणी अहवाल समाधानकारक सादर केला असून, मे. एचडीएफसी च्या बँक खात्यातून मंडळाचा आर्थिक व्यवहार टप्प्याटप्प्याने सुरू करण्याबाबत व मे. एचडीएफसी बँकेच्या स्वखर्चाने web portal / MIS managment आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून देणे आवश्यक राहील याबाबतचा प्रस्ताव मा.मंत्री (कामगार) तथा मा. अध्यक्ष यांना प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावास मा मा.मंत्री (कामगार) तथा मा. अध्यक्ष यांनी मान्यता प्रदान केली आहे.

४. मंडळाकडील नोंदीत जिवीत बांधकाम कामगारांना ऑनलाईन पध्दतीने विविध कल्याणकारी योजनांतर्गत (DIRECT BENEFIT TRANSFER) थेट लाभ हस्तांतरण

पध्दतीने लाभ वाटपाच्या कार्यपध्दतीत सुलभता येण्यासाठी तसेच, आवश्यक ते अहवाल प्राप्त होण्यासाठी सॉफ्टवेअर सोल्यूशन व बॅकिग सेवा, तसेच Real Time Dash Board विकसित करण्याचे मान्य केलेले आहे. त्यानुसार मंडळाच्या बॅक खात्यावरील कोणत्याही व्यवहारामध्ये ( Bank Transaction) बॅकेकडून परंस्पर हस्तक्षेप होणार नाही तसेच मंडळाच्या पूर्व परवानगी शिवाय कोणतेही व्यवहार ( Transaction) होणार नाहीत आणि प्रस्तावित MIS Protal/Dash Board व विविध अहवाल इत्यादी. संगणकीय प्रणाली विकसित करताना RBI आणि माहिती तंत्रज्ञान विभागाने वेळोवळी निर्गत केलेल्या सुरक्षा उपाय योजना आणि मार्गदर्शन सुचनाचा अवलंब करण्याबाबत आणि त्या अनुषंगाने बॅकेत प्रस्तावित केलेले MIS Protal विकसित करण्यासाठीचे मे. एच.डी.एफ.सी. बॅकेस दि. ०८.१२.२०२२ अन्वये कळविण्यात आले आहे. मंडळांतर्गत नोंदीत बांधकाम कामगारांना विविध कल्याणकारी योजनेंतर्गत थेट लाभ हस्तांतरण (DBT) द्वारे लाभ वाटपासाठी मे. एच.डी.एफ.सी. बॅकेत स्वतंत्र बॅंक खाते उघडण्याबाबत मंडळामार्फत कार्यवाही करण्यात आली आहे.

याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र. ५९(११)/२०२२:-**

(अ) **मंडळांतर्गत नोंदीत बांधकाम कामगारांना विविध कल्याणकारी योजनेंतर्गत थेट लाभ हस्तांतरण (DBT) द्वारे लाभ वाटपासाठी व इतर आर्थिक** व्यवहाराकरीता मे. एच.डी.एफ.सी. बॅकेत **स्वतंत्र बॅंक खाते उघडण्यास मान्यता.**

(ब) **DBT द्वारे लाभ वाटपाच्या कार्यपध्दतीत सुलभता येण्यासाठी तसेच आवश्यक ते अहवाल प्राप्त होण्यासाठी सॉफ्टवेअर सोल्यूशन व बॅकिग सेवा, तसेच Real Time Dash Board इत्यादीद्वारे MIS Protal** मे. एच.डी.एफ.सी. बॅकेने **स्वखर्चाने विकसित करण्याचे कार्यवाहीस मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

**असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याण मंडळ, मुंबई

**विषय क्र.१२ :- मंत्रालयीन व मंडळाकडील संगणक विषयक कामकाजाकरीता संगणक तांत्रिक सल्लागारांच्या (ग्रॅन्ट थॉर्न्टन) नियुक्तीस मुदतवाढ देणे.**

मंडळ सचिव यांनी सादर केले की, मंडळाच्या दि. २७.१०.२०२० रोजी संपन्न बैठकीतील ठराव क्र. ५६/(७)/२०२० नुसार मंडळाचे पत्र दिनांक १२.११.२०२० नुसार मंडळाच्या निविदा/अभिव्यक्ती स्वारस्य (EOI) तयार करणे व अनुषंगिक कामाकरीता दिनांक २७.११.२०२० ते दिनांक २६.०५.२०२१ या कालावधीकरीता २ मॅनेजिंग कन्सल्टंट व २ सिनियर कन्सल्टंट यांची ०६ महीनेकरीता नियुक्ती करण्यात आली होती.

२. मंडळाच्या दिनांक २५.०५.२०२१ रोजीच्या आदेशान्वये सदर कंत्राटास दिनांक २७.०५.२०२१ ते दिनांक २६.११.२०२१ या ६ महिन्यांच्या कालावधीकरीता पहीली मुदतवाढ देण्यात आली होती. नियुक्त ४ सल्लागार (मे. ग्रँन्ट थॉर्न्टन) यांची विहीत कार्यपद्धतीचा अवलंब करुन मंडळ व कामगार विभाग, मंत्रालय येथील कामकाजाकरिता सल्लागार म्हणून दिनांक ०३.१२.२०२१ रोजीच्या शासनाचे कार्यादेशान्वये व मंडळाच्या दिनांक १५.१२.२०२१ रोजीच्या कार्यादेशान्वये दिनांक २७.११.२०२१ ते दिनांक २६.११.२०२२ पर्यंत ०१ वर्षापर्यंत दुसरी मुदतवाढ देण्यात आली होती.

३. शासनाच्या दिनांक १५.११.२०२२ रोजीच्या पत्रान्वये, मे.ग्रॅन्ट थॉर्न्टन इंडिया एल. एल. पी. यांच्या ४ सल्लागारांना दि.२७.११.२०२२ पासुन पुढील १ वर्ष मुदतवाढ देण्यात यावी व त्याप्रमाणे मंडळाच्या बैठकीमध्ये याबाबत मान्यता घेण्यात यावी असे नमुद केले आहे. त्या अनुषंगाने दि.२८.११.२०२२ रोजीच्या पत्रान्वये एक वर्षाची मुदतवाढ देण्यात आली आहे.
सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला आहे.

ठराव क्र.५९ (१२)/२०२२ :-

**मंत्रालयीन व मंडळाकडील संगणक विषयक कामकाजाकरीता संगणक तांत्रिक सल्लागारांच्या नियुक्तीस शासन निर्देशानुसार ०१ वर्ष मुदतवाढीबाबत मंडळाने केलेल्या कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्याचा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याण मंडळ, मुंबई

**विषय क्र.१३ :- लखनऊ (उत्तर प्रदेश) येथे उपकर संकलन कार्यपध्दतीचा आढावा घेण्याकरीता अभ्यास दौरा आयोजित करणे**

मंडळ सचिवांनी सादर केले की, मा. मंत्री (कामगार) तथा मा.अध्यक्ष यांनी घेतलेल्या आढावा बैठकीत मंडळाकडे जमा होणारा उपकर वाढविण्याबाबत कार्यवाही करणेबाबत निर्देश दिलेले आहेत.

२. वरील बाबींच्या अनुषंगाने लखनऊ (उत्तरप्रदेश) येथे जमा होणाऱ्या उपकराची कार्यपध्दती व इतर बाबींचा अभ्यास करणेबाबत दौरा आयोजित करणे प्रस्तावित करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने मा. मंत्री महोदय कार्यालयातील प्रतिनिधी, मा. प्रधान सचिव तसेच मंडळ मुख्यालयातील अधिकारी यांचा दौरा आयोजित करण्याबाबत मा. अध्यक्ष तथा मंत्री महोदय, कामगार विभाग यांना प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

३. सादर करण्यात आलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने मा. अध्यक्ष तथा मंत्री महोदय, कामगार विभाग यांनी सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी लखनऊ (उत्तर प्रदेश) येथील उपकर संकलन कार्यपध्दतीचा आढावा घेऊन अहवाल सादर करणेबाबत निर्देशित केले आहे.

४. मा. अध्यक्ष यांनी सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सदर प्रकरणी उपकर संकलन कार्यपध्दतीचा अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. त्याबाबत मंडळ सचिव यांनी लखनऊ (उत्तर प्रदेश) येथील अभ्यास दौऱ्याचा अहवाल लवकरात लवकर सादर करण्यात येणार असल्याचे सांगितले.

सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र.५९(१३)/२०२२ :-**

**मा. अध्यक्ष तथा मंत्री महोदय, कामगार यांनी दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने लखनऊ (उत्तर प्रदेश) येथे उपकर संकलन कार्यपध्दतीचा आढावा घेण्याकरीता अभ्यास दौऱ्याबाबत मंडळाने केलेल्या कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्याचा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याण मंडळ, मुंबई

**विषय क्र.१४:- बांधकाम कामगारांची नोंदणी,नुतनीकरण,लाभ वाटपाबाबतची माहिती मंडळाच्या पटलावर ठेवणे.**

मंडळ सचिव यांनी सादर केले की, मंडळाच्या ऑनलाईन पध्दतीने नोंदणी, नुतनीकरण व विविध कल्याणकारी योजनातर्गत लाभ वाटपचा (DBT) तपशील खालीलप्रमाणे:-

| अ.क्र. | महिना | नव्याने झालेली नोंदणी | नव्याने झालेले नूतनीकरण | एकूण झालेले लाभ वाटप |
|---|---|---|---|---|
| १ | एप्रिल - २०२२ | ६६,४०५ | १५६०५ | २६८२९ |
| २ | मे - २०२२ | ५२,१३४ | १३६२५ | २२०४५ |
| ३ | जुन - २०२२ | ६३२९८ | १३६२८ | १७४६० |
| ४ | जुलै-२०२२ | ६२७३१ | ११४५७ | १३५९३ |
| ५ | ऑगस्ट-२०२२ | ५५८२६ | १०८८४ | ६०३४ |
| ६ | सप्टेंबर-२०२२ | ८२८०० | १८२४७ | ७६४९ |
| ७ | ऑक्टोबर-२०२२ | ७७९१० | १८८७६ | १४६६३ |
| ८ | नोव्हेंबर-२०२२ | २४१३०४ | १९८३९ | १४९४३ |
| | **एकूण** | **७,०२,४०८** | **१,२२,१६१** | **१,२३,२१६** |

उपरोक्त तपशील मंडळाच्या पटलावर ठेवण्यात येत आहे.

**ठराव क्र. ५९(१४)/२०२२ :-**

**माहे एप्रिल, २०२२ ते नोव्हेंबर,२०२२ अखेर मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर बांधकाम कामगारांची नोंदणी ७,०२,४०८ व नुतनीकरण १,२२,१६१ आणि विविध कल्याणकारी योजनांच्या लाभ वाटप संख्या १,२३,२१६ याबाबत मंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या माहितीस मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याण मंडळ, मुंबई

**विषय क्र.१५:- मंडळाकडील उपकर जमा व योजनानिहाय खर्चास मंजूरी देणे.**

मंडळ सचिव यांनी सादर केले की,इमारत व इतर बांधकाम कामगार यांचे संदर्भात रोजगार व सेवाशर्ती तसेच त्यांची सुरक्षा, आरोग्य,कल्याण विषयक व इतर संबंधित बाबीसाठी तरतूदी करण्याच्या उद्देशाने करण्यात आलेल्या इमारत व इतर बांधकाम (रोजगार व सेवाशर्ती नियमन)अधिनियम,१९९६ या केंद्रीय अधिनियमांतील तरतुदीच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने इमारत व इतर बांधकाम नियम २००७ तयार केलेले आहेत. इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर अधिनियम ,१९९६ च्या कलम ३(१)अनुसार केंद्र शासनाने अधिसूचना क्र.एसओ २८९९, दि.२६ सप्टेंबर १९९६ अन्वये बांधकामाच्या एकूण मुल्याच्या (जमिनीचे मुल्य वगळून) १% दराने उपकर गोळा करण्याचे आदेश निर्गमित केले आहेत. त्यानुसार मंडळाकडील बँक खात्यामध्ये उपकर जमा होत आहे. तसेच नोंदीत,सक्रिय (जिवित) बांधकाम कामगारांसाठी मंडळाअंतर्गत राबविल्या जाणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ दिला जातो.

२. सद्यस्थितीत सन २०२२-२३ मध्ये, महाराष्ट्र इमारत व इतर कामगार कल्याणकारी मंडळाने माहे नोव्हेंबर, २०२२ अखेर केलेल्या जमा उपकर व योजनानिहाय खर्चाचा गोषवारा खालीलप्रमाणे :-

| महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सन २०२२-२०२३ | | | | | | (रक्कम रु. कोटीत) | | | |
| अ.क्र | महिना | जमा | योजनानिहाय खर्च | | | | | | |
| | | उपकर | मध्यान्ह भोजन | अत्यावश्यक संच | सुरक्षा संच | आरोग्य तपासणी | ऑनलाइन पद्धतीने लाभ वाटप (DBT) | प्रशासकीय खर्च | एकूण |
| १ | एप्रिल - २०२२ | 261.5 | 63.26 | 13.59 | 13.61 | 0 | 11.18 | 7.8 | 109.44 |
| २ | मे - २०२२ | 159.29 | 168.56 | 44.06 | 43.64 | 9.02 | 29.4 | 7.96 | 302.64 |
| ३ | जुन - २०२२ | 160.88 | 221.59 | 26.37 | 26.01 | 8.16 | 21.17 | 8.15 | 311.45 |
| ४ | जुलै-२०२२ | 214.98 | 291.36 | 28.27 | 28.02 | 4.62 | 21.54 | 5.04 | 378.85 |
| ५ | ऑगस्ट-२०२२ | 251.93 | 233.37 | 28.7 | 28.46 | 2.23 | 23.03 | 3.87 | 319.66 |
| ६ | सप्टेंबर-२०२२ | 137.00 | 269.24 | 25.15 | 24.89 | 8.5 | 17.82 | 3.38 | 348.98 |
| ७ | ऑक्टोबर-२०२२ | 185.13 | 220.62 | 32.88 | 32.6 | 6.67 | 17.98 | 7.24 | 317.99 |
| ८ | नोव्हेंबर-२०२२ | 242.44 | 176.57 | 14.44 | 14.26 | 1.26 | 20.34 | 5.69 | 232.56 |
| | एकूण | 1613.15 | 1644.57 | 213.46 | 211.49 | 40.46 | 162.46 | 49.13 | 2321.57 |

उपरोक्त विषयाची सर्व मंडळ संदस्यांनी नोंद घेतली. मा. कामगार आयुक्त यांनी जमेपेक्षा जास्त खर्च दिसून येत असल्याने उपकर वाढीबाबत मंडळाकडून उपाययोजना करणे आवश्यक आहे असे मत नोंदविले. सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव खालीलप्रमाणे

ठराव क्र. ५९(१५)/२०२२ :-

सन २०२२-२३ मध्ये, महाराष्ट्र इमारत व इतर कामगार कल्याणकारी मंडळाने माहे नोव्हेंबर, २०२२ अखेर केलेल्या जमा उपकर व योजनानिहाय खर्चास मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे, असा ठराव सर्वानुमते पारीत करण्यात आला.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याण मंडळ, मुंबई

**विषय क्र.१६:- मंडळाकडील अतिरिक्त निधीची गुंतवणूक राष्ट्रीयकृत बँकेत गुंतवणूक करण्यासाठी मंजूरी देणे.**

मंडळ सचिव यांनी सादर केले की, मा. मंत्री (कामगार) तथा मा. अध्यक्ष, गुंतवणुक उपसमिती यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या मुदत ठेव गुंतवणुक उपसमितीची स्थापना करण्यात आली आहे. सदर बैठकीत गुंतवणुक उपसमितीतील खालील सन्माननीय सदस्य आहेत.

| अ.क्र. | सदस्याचे नाव | पद |
|---|---|---|
| १. | मा. मंत्री महोदय, कामगार विभाग | अध्यक्ष |
| २. | मा. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई | सदस्य |
| ३. | उप सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| ४. | सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ,मुंबई | सदस्य |

**२.** मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार व वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक २७.१०.२०१५ व दिनांक १३.०३.२०२० रोजीच्या शासन निर्णयातील मार्गदर्शक सुचनानुसार मंडळाकडील जमा उपकर निधीपैकी अतिरिक्त निधीची गुंतवणुक विविध राष्ट्रीयकृत बँकांमध्ये एका वर्षाकरीता करण्यात आलेली आहे, मुदत ठेव गुंतवणुकीचा तपशिल खालीलप्रमाणे :-

| अ. क्र. | बँकेचे नाव | शाखेचे नाव | गुंतवणूक दिनांक | गुंतवणुक रक्कम (रू.कोटीत) | व्याजदर द.सा.द.शे | परिपक्व रक्कम (रू. कोटीत) |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | युनियन बँक ऑफ इंडिया | घाटकोपर (पुर्व), मुंबई | दि.१४.०१.२०२२ | १४०० | ४.३०% | १४६१.१७ |
| २. | युनियन बँक ऑफ इंडिया | घाटकोपर (पुर्व), मुंबई | दि.२७.०१.२०२२ | १२०० | ४.३७% | १२५३.३० |
| ३. | कॅनरा बँक, | बी. के.सी. वान्द्रे (पुर्व), मुंबई. | दि.१६.०४.२०२२ | १०५० | ५.००% | ११०३.४९ |
| ४. | कॅनरा बँक, | बी. के.सी. वान्द्रे (पुर्व), मुंबई. | दि.११.०५.२०२२ | ८०० | ५.१५% | ८४२.०० |
| ५. | कॅनरा बँक, | बी. के.सी. वान्द्रे (पुर्व), मुंबई. | दि.१८.०५.२०२२ | ११५० | ५.२०% | १२१०.९७ |

| अ. क्र. | बँकेचे नाव | शाखेचे नाव | गुंतवणूक दिनांक | गुंतवणुक रक्कम (रू.कोटीत ) | व्याजदर द.सा.द. शे | परिपक्व रक्कम (रू. कोटीत) |
|---|---|---|---|---|---|---|
| ६. | कॅनरा बँक, | बी. के.सी. वान्द्रे (पुर्व), मुंबई. | दि.२५.०५.२०२२ | १६५० | ५.४३% | १७३९.५९ |
| ७. | कॅनरा बँक, | बी. के.सी. वान्द्रे (पुर्व), मुंबई. | दि.०८.०७.२०२२ | ६७० | ६.७६% | ७१६ |
| ८. | स्टेट बँक ऑफ इंडिया | बी. के.सी. वान्द्रे (पुर्व), मुंबई. | दि.०६.०९.२०२२ | १२५० | ७.०५% | १३३८.१२ |
| ९. | युनियन बँक ऑफ इंडिया. | घाटकोपर (पुर्व), मुंबई | दि.१२.१०.२०२२ | १२५० | ७.३२% | १६६६.६१ |
| | एकूण | | | १०७२० | | ११३३१.१५ |

**सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.**

**ठराव क्र.५९ (१६)/२०२१ :- उपरोक्त मंडळाकडील अतिरिक्त निधीची गुंतवणूक राष्ट्रीयकृत बँकेत करण्यात आली असून, त्याबाबत केलेल्या कार्यवाहीस मंडळाने मान्यता प्रदान केली, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याण मंडळ, मुंबई

**विषय क्र.१७ :- मा. उच्च न्यायालय मुबई याचिका क्र. २७६९६/२०२१, रिट याचिका क्र.७७०१/२०२२, मे. आरसीएस इन्फोटेक प्रा.लि.व मे. आयटी आय लिमिटेड लवाद प्रकरणी कोविड विषाणू प्रादुर्भाव कालावधीत देण्यात आलेल्या अर्थसहाय्यापोटी झालेला खर्च वसूली प्रकरणी धोरणात्मक निर्णय घेणे.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, कोविड-१९ विषाणूच्या प्रादुर्भाव काळात वितरीत करण्यात आलेल्या रू.२०००/-, रू.३०००/- व रू.१५००/- अर्थसहाय्याबाबत मे. आय.टी.आय. लिमिटेड व मे. आरसीएस प्रा.लि. या संस्थाचे देयकांची अदायगी रोखण्याबाबत शासनामार्फत निर्देश प्राप्त झाले होते.

२. शासनाच्या दिनांक १७.११.२०२१ रोजीच्या पत्रान्वये पुरवठा संस्थांकडून प्राप्त झालेल्या देयकांपैकी ५०% रक्कम अदा करण्यात यावी व देय असलेल्या रक्कमेतून ५०% एवढी रक्कम ही वसूल करावयाच्या रू.११.५३ कोटी रककमेच्या वसूल प्रित्यर्थ कापून घेण्यात यावी. संस्थेकडून वसूल करावयाची रू.११.५३ कोटी रक्कम ही दि.३१.०३.२०२३ पर्यंत देय होणाऱ्या रक्कमांमधून वसूल करण्यात यावी तसेच, वसूलीसंदर्भात ०७ दिवसात संमतीपत्र मागविण्यात यावे. सदर संमतीपत्र न दिल्यास उपरोक्त रक्कमेसह इतर कोणतीही रक्कम संबंधितांना अदा न करता करावयाची वसुली ही बँक गँरटीतून करण्यात यावी असे निर्देश देण्यात आले होते. तद्नंतर मे. आरसीएस इन्फो प्रा.लि. यांनी मा. उच्च न्यायालयात मंडळ यांचे विरूध्द याचिका क्र.२७६९६/२०२१ सादर केल्याचे त्यांच्या विधी सल्लागारांनी दिनांक २७.११.२०२१ रोजी मंडळास कळविले. सदर याचिकेसंदर्भात दिनांक २९.११.२०२१, दिनांक २०.१२.२०२१ व दिनांक १२.०१.२०२२ रोजी सुनावणी झाली. सदर सुनावणीमध्ये संस्थेने मंडळाकडे जमा केलेल्या बँक गँरटीमधून वसुलीस स्थगिती देण्यात आली. सदर याचिकेसंदर्भात मा. अध्यक्ष महोदयांच्या अनुमतीने मंडळाचे शपथपत्र दिनांक १०.०१.२०२२ रोजी मा. उच्च न्यायालयात सादर करण्यात आले होते.

३. सदर याचिकामध्ये मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी दिनांक ०१.०७.२०२२ रोजी मा. श्री. नरेश पाटील सेवानिवृत्त मुख्य न्यायाधीश म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तद्नंतर मे. आयटीआय लिमिटेड व मे. आरसीएस इन्फो प्रा.लि. यांच्या विरूध्दच्या लवाद प्रकरणाच्या स्थितीबाबत मा. श्री. नरेश पाटील, सेवानिवृत्त मुख्य न्यायाधीश यांचेकडील दि. १५.०७.२०२२ रोजीच्या ई-मेल द्वारे वादी आणि प्रतिवादी यांची प्राथमिक बैठक दिनांक १६.०७.२०२२ रोजी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे आयोजित करण्यात आली होती. सदर प्रकरणी संबंधित संस्थेने केलेली मागणी फेटाळून, मंडळाच्या वतीने शपथपत्र दिनांक ३०.०७.२०२२ रोजी मा. लवादासमोर दाखल करून भूमिका मांडली होती.

४. मा. न्यायमूर्ती श्री. नरेश पाटील, सेवानिवृत्त मुख्य न्यायाधीश मा. उच्च न्यायालय लवाद यांचे दिनांक २६.०९.२०२२ रोजीच्या बैठकीतील निर्देशाच्या अनुषंगाने दिनांक २१.१०.२०२२ रोजीच्या पत्रान्वये दाव्याच्या विधानावर परिच्छेदनिहाय अभिप्राय शासनास

सादर करण्यात आले होते. सदर प्रकरणाची सुनावणी दिनांक ०७.११.२०२२ रोजी असल्याने संबंधित संस्थेने केलेली मागणी फेटाळून सुधारित परिच्छेद निहाय अभिप्राय शासन मान्यतेसाठी सादर करण्यात आले होते. तसेच, **मे. आरसीएस इन्फोटेक प्रा.लि. व मे. आयटी आय लिमिटेड लवाद प्रकरणी कोविड विषाणू प्रादुर्भाव कालावधीत देण्यात आलेल्या अर्थसहाय्यापोटी झालेला खर्च वसूली प्रकरणी मंडळाची भूमिका शासनास वेळोवेळी अवगत करण्यात आली आहे.**

**५.** दरम्यानच्या कालावधीत सदर याचिकेची सुनावणी दिनांक ०८.११.२०२२ रोजी आयोजित करण्यात आली होती परंतु, सदर सुनावणी पुढे ढकलण्यात आली असल्याबाबत मा. श्री. नरेश पाटील, सेवानिवृत्त मुख्य न्यायाधीश मा. उच्च न्यायालय यांनी कळवले होते. तद्नंतर मे. आरसीएस इन्फोटेक यांच्या दिनांक ०३.११.२०२२ रोजी ई-मेल द्वारे सदर लवादाप्रकरणी वाटाघाटी करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सादर प्रस्तावाच्या अनुषंगाने मंडळाच्या दिनांक २२.११.२०२२ रोजीच्या ई-मेल अन्वये दिनांक २४.११.२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता बैठकीस उपस्थित राहणेबाबत संस्थेस कळविण्यात आले होते. सदर बैठकीत मे. आयटीआय लिमिटेड व मे. आरसीएस इन्फो प्रा.लि. यांनी खालीलप्रमाणे रक्कम वसूली करण्याबाबत प्रस्ताव दिला होता.

| Sr. No. | Particulars | Amount in Rs. |
|---|---|---|
| १. | Invoice Amount withheld (A) | १३,६१,५५,९६५ |
| २. | DBT Transaction Amount (B) | ४,५३,५२,४७० |
| ३. | GST Amount (C) | २,०७,६९,५५४ |
| ४. | Total Amount claimed by MSP (D=A-(B+C) | ७,००,३३,९४१ |
| ५. | Total amount to be Recovered by MBOCWW Board (E=A-D) | ६,६१,२२,०२४ |

**६.** सदर बैठकीत खालील मुद्यांबाबत चर्चा करण्यात आली.

- कोविड-१९ अर्थसहाय्याच्या रू.२०००/- अर्थसहाय्याच्या प्रदानासाठी वापरण्यात आलेला लाभार्थी तपशील हा रू.३०००/- अर्थसहाय्य प्रदानाच्या लाभाकरीता वापरण्यात आलेला असल्याने रू.३०००/- च्या लाभाकरीता झालेला खर्च अनुज्ञेय नसल्याचे मंडळाचे तत्कालीन सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दिनांक ०५.०७.२०२१ रोजीच्या पत्रान्वये संस्थेस कळविले होते.
- रू. १५००/- अर्थसहाय्याच्या प्रदानाकरीता वापरण्यात आलेला लाभार्थी तपशील हा जवळपास रू.२०००/- अर्थसहाय्य प्रदानाच्या लाभार्थी तपशीलाच्या एकसारखाच आहे.
- तसेच, पुरवठादार संस्थेकडून झालेल्या वस्तू व सेवाकरील खर्चाची मंडळाकडून प्रतिपूर्ती मान्य होणार नाही.

➢ वरील नमूद बार्बीवर विचार करून सुधारित प्रस्ताव सादर करणेबाबत संबंधित पुरवठादार संस्थेला सूचित केले होते.

७. वरील मुद्यांच्या अनुषंगाने दिनांक २५.११.२०२२ वाजता सकाळी ११.०० वाजता बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत मे. आरसीएस इन्फो प्रा.लि. यांनी खालीलप्रमाणे सुधारित प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

➢ पुरवठादार संस्थेने कोविड अर्थसहाय्य रू.३०००/- च्या प्रदानाकरीता झालेला खर्चासाठी दावा करणार नसल्याचे मान्य केले.
➢ पुरवठादार संस्थेने रू. १५००/- अर्थसहाय्याच्या प्रदानाकरीता वापरण्यात आलेला लाभार्थी तपशील हा जवळपास रू.२०००/- अर्थसहाय्य प्रदानाच्या लाभार्थी तपशीलाच्या एकसारखाच असल्याने रू.१५००/- अर्थसहाय्य प्रदानावरील खर्च सारखाच असल्याचे मंडळाची भूमिका मान्य नसल्याचे नमूद केले. त्यानुसार सुधारित प्रस्ताव खालीलप्रमाणे सादर केला आहे.

| Sr. No. | Particulars | Amount in Rs. |
|---|---|---|
| १ | Amount Paid to MSP towards this two covid claims (A) | १३,६१,५५,९६४/- |
| २ | DBT Transaction Amount (B) | ३,०४,९८,६१५/- |
| ३ | GST Amount on B (C) | ५४,८९,७५१/- |
| ४ | **Total Amount to be recovered by MBOCWW Board (D=A-(B+C))** | **१०,०१,६७,५९९/-** |

➢ सदर बैठकीत मे. आरसीएस इन्फो प्रा.लि. यांनी वस्तू व सेवाकराच्या रक्कमेबाबत व वजावटीबाबत पुरवठादार संस्थेची सहमती असल्याचे सांगितले.
➢ दि.०१.०१.२०२३ पासून मे. आरसीएस इन्फो प्रा.लि. यांनी वसूलीची रक्कम करार संपुष्टात येईपर्यंत दरमहा समान हफ्त्यात वसूल करण्याबाबत मागणी केली आहे.
➢ पुरवठादार संस्थेचे राखून ठेवलेले देयकांची अदायगी लवादाचे प्रकरण मागे घेतलेल्या दिनांकपासून ०७ दिवसात अदा करण्याबाबत मागणी केली आहे.
➢ पुरवठादार संस्थेने मोबीलायझेशन अॅडव्हान्स ची किंमत जेवढी रक्कम वसूल करण्यात आली आहे तेवढी रक्कम कमी करण्याबाबत मागणी केली आहे.
➢ पुरवठादार संस्थेने मंडळाकडून सुरक्षा अनामत रक्कम कंत्राट रक्कमेच्या ०३% करण्याबाबत मागणी केली आहे.
➢ पुरवठादार संस्थेने भविष्यात अशा प्रकारचे प्रदान करावयाचे झाल्यास रू. १५/- प्रति लाभ अधिक वस्तू व सेवाकर अशी आकारणी करण्याबाबत मागणी केली.

➢ वरीलप्रमाणे सादर प्रस्ताव मा.मंत्री (कामगार) तथा मा. **अध्यक्ष** यांच्या मान्यतेने शासन मान्यतेस सादर करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

८. वरीलप्रमाणे दिनांक २४.११.२०२२ व दिनांक २५.११.२०२२ अन्वये या बैठकीचे इतिवृत्तांत मा.मंत्री (कामगार) तथा मा. **अध्यक्ष** यांना मंजूरीस्तव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावास .मंत्री (कामगार) तथा मा. **अध्यक्ष** यांनी मान्यता प्रदान केली आहे. सदर मान्यतेच्या अनुषंगाने प्रस्ताव दिनांक ०८.१२.२०२२ रोजी शासन मान्यतेस सादर करण्यात आला आहे.

**ठराव क्र.५९(१७)/२०२२ :-**

**मा. उच्च न्यायालय मुबई याचिका क्र. २७६९६/२०२१, रिट याचिका क्र.७७०१/२०२२, मे. आरसीएस इन्फोटेक प्रा.लि. व मे. आयटीआय लिमिटेड लवाद प्रकरणी कोविड विषाणू प्रादुर्भाव कालावधीत देण्यात आलेल्या अर्थसहाय्यापोटी झालेल्या खर्चाबाबतच्या प्रस्तावावर उपरोक्तप्रमाणे मंडळाने केलेली कार्यवाहीस मान्यता देण्याचा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याण मंडळ, मुंबई

**विषय क्र.१८ :- शासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना सेवा करार पध्दतीने विवक्षित पध्दतीने कामाकरीता नियुक्त करण्यास मंजूरी देणे.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, शासकीय /निमशासकीय सेवानिवृत्त अधिका-यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेणेबाबत सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण -२७१५/प्र.क्र.१००/१३ दि. १७ डिसेंबर २०१६ नुसार तरतुद करण्यात आली आहे. या शासन निर्णयातील मुद्दा क्रं. अ मधील तरतुदी नुसार करार पध्दतीने “विवक्षित कामांसाठी” नेमणूका करताना पारदर्शक पध्दतीचा अवलंब करण्यात यावा. विहीत पध्दतीने जाहिरात देऊन “विवक्षित कामांसाठी” पात्र सेवानिवृत्त अधिका-यांकडून अर्ज मागविण्यात यावेत. जाहिरातीमध्ये नामिकासुचीत नियुक्त करावयाच्या एकुण व्यक्तिंची संख्या, विवक्षित कामाचे स्वरूप, कालावधी आणि देय मासिक पारिश्रामिक यांचा उल्लेख करण्यात यावा आणि प्राप्त अर्जातून पात्र उमेदवाराची निवड करून नामिकासुची नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांनी तयार करावी असे नमुद केले आहे.

२. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या आर्थिक वर्षाचे लेखे, वार्षिक अर्थसंकल्प, वस्तु व सेवाकर व आयकर विषयक कामकाज, गुंतवणुक व ठेवी, अंतर्गत लेखापरिक्षण, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ व सर्व जिल्हा कार्यालयांमध्ये इमारत व इतर बांधकाम कामगारांची नोंदणी, नोंदित बांधकाम कामगारांचे नूतनीकरण आणि नोंदित बांधकाम कामगारांना कल्याणकारी योजनांच्या लाभाचे वाटप करणेकरीता संबंधित कामे करण्यासाठी पुरेसा कर्मचारी वर्ग उपलब्ध नाही.

३. सबब, नव्याने करार पध्दतीने कर्मचारी वर्ग व महाराष्ट्र शासनाच्या सेवेतून गट “अ” व “ब” मधून सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांची मंडळ मुख्यालयात नियुक्तीसाठी मंत्रालयीन प्रशासकीय विभागातील सेवानिवृत्त अवर सचिव व कक्ष अधिकारी, कामगार विभागातील कामगार उपायुक्त, सहायक कामगार आयुक्त, व सरकारी कामगार अधिकारी तसेच वित्त विभागातील (संचालनालय,लेखा व कोषागारे) ,लेखा अधिकारी,सहायक लेखा अधिकारी या पदावर प्रशासन/वित्त व लेखा विषयक कामकाजाचा अनुभव असणाऱ्या सेवानिवृत्त अधिका-यांची मंडळाच्या आस्थापनेवर सेवा करार पध्दतीने विवक्षित कामकाजाकरीता शैक्षणिक पात्रता व अनुभव असणाऱ्या सेवानिवृत्त अधिका-यांची नियुक्तीची कार्यवाही करणेबाबतचा प्रस्ताव मा.मंत्री (कामगार) तथा मा. अध्यक्ष यांना मान्यतेस सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावास मा.मंत्री (कामगार) तथा मा. अध्यक्ष यांनी मान्यता प्रदान केली होती.

४. सदर विषयाबाबत मा.मंत्री (कामगार) तथा मा. अध्यक्ष यांनी ०६ महसूली विभागात ०६ सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात यावी तसेच महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळातील अधिकचा असलेला अधिकारी / कर्मचारी महाराष्ट्र इमारत व इतर

बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकरीता वापरता येईल का हे तपासण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

**ठराव क्र.५९ (१८)/२०२२ :-**

**सेवानिवृत्त अवर सचिव व कक्ष अधिकारी, कामगार विभागातील कामगार उपायुक्त, सहायक कामगार आयुक्त, व सरकारी कामगार अधिकारी तसेच वित्त विभागातील (संचालनालय,लेखा व कोषागारे) ,लेखा अधिकारी,सहायक लेखा अधिकारी या पदावर प्रशासन/वित्त व लेखा विषयक कामकाजाचा अनुभव असणाऱ्या सेवानिवृत्त अधिका-यांची मंडळाच्या आस्थापनेवर सेवा करार पध्दतीने विवक्षित कामकाजाकरीता शैक्षणिक पात्रता व अनुभव असणाऱ्या सेवानिवृत्त अधिका-यांची नियुक्ती करण्याबाबत मंडळाने मान्यता प्रदान केली, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याण मंडळ, मुंबई

**विषय क्र. १९ :- उपकर परतावा प्रकरणांना मान्यता तथा मंजूरी देणे.**

मंडळ सचिव यांनी सादर केले की, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार उपकर नियम १९९८ मधील नियम ८ अन्वये उपकराची परिगणना चूकीची झाल्यास अथवा चुकीच्या पध्दतीने उपकराचा भरणा मंडळाकडे झाल्यास तो परतावा करण्याबाबत तरतूद आहे. मंडळाच्या दिनांक १८.०७.२०१८ मधील ठराव क्र ४७(१२)/२०१८ अन्वये, मंडळाच्या दिनांक १६.०६.२०१८ रोजीच्या बैठकीच्या ठरावानुसार उपकर परतावा करताना सदर प्रकरणे संबंधित जिल्हा कार्यालयाकडून छाननी करून विभागीय कार्यालयांमार्फत परताव्याची शिफारस प्राप्त झाल्यावर मंडळ स्तरावर छाननी अंती प्रस्ताव मान्यतेस्तव सादर करण्यात यावा व शासन मान्यतेनुसार मंडळ स्तरावरून परताव्याची कार्यवाही करण्यात यावी अशी असा ठराव मंजूर आहे.

२. त्यानुसार, मंडळाचे दिनांक ०२.०३.२०२१ रोजी झालेल्या ५७ व्या बैठकीपासून आज अखेर, मंडळाच्या ठरावाच्या अनुषंगाने महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या बँक खात्यात अनावधानाने/नजरचुकीने उपकराची जास्तीची रक्कम भरणा केलेल्या एकूण २२(बावीस) प्राधिकरण/संस्था/व्यक्ति यांजकडून उपकराच्या रकमेच्या परताव्याची मागणी करण्यात आलेली होती. सदर २२ (बावीस) प्रकरणांपैकी पुढील नमुद ११ (अकरा) परतावा प्रकरणे संबंधित जिल्हा कार्यालयाकडून छाननी करून विभागीय कार्यालयांमार्फत परताव्याची शिफारस प्राप्त झाल्यावर मंडळ स्तरावर छाननी अंती मा.मंत्री (कामगार) तथा मा. अध्यक्ष यांचे मान्यतेने RTGS प्रणालीद्वारे संबंधितांना परतावा अदा करण्यात आला आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.क्र. | आस्थापनाचे नाव | उपकर परतावा मागणी रक्कम (रु) | आरटीजीद्वारे परतावा अदा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | मे.पुरोहितॲन्ड असोसिएटस, मुंबई | १५,३८,००५/- | RTGS दि.१२.८.२०२१ |
| २ | सुरेश पांडुरंग शिरभाते | ७७,९५९/- | RTGS दि.०९.०७.२०२१ |
| ३ | पंकज माधवराव पाटील | १,०५,६५०/- | RTGS दि.५.०८.२०२१ |

| अ.क्र. | आस्थापनाचे नाव | उपकर परतावा मागणी रक्कम (रु) | आरटीजीद्वारे परतावा अदा तपशिल |
|---|---|---|---|
| ४ | दिपक पिंगळे, नंदुरबार | १५,६५५/- | RTGS दि. ०६.०४.२०२१ |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | मेट्रो रेल कॉ.लि. | ५०,३५,७०१/- | RTGS दि. १४.६.२०२१ |
| ६ | कोलंबिया पेट्रो केम प्रा.लि | १,६८,१३,५८९/- | RTGS दि. २.०४.२०२१ |
| ७ | मे. शुभम बिल्डर्स अॅन्ड डेव्हलपर्स, पनवेल | ८,५४,७९३/- | RTGS दि. १५.०६.२०२२ |
| ८ | नागपूर मुंबई सुपर कमर्शियल एक्सप्रेस लि | ६,९४,४७,५४०/- | RTGS दि. १६.२.२०२२ |
| ९ | राजाराम बुधा पाटील, धुळे | १९,१९७/- | RTGS दि. ०७.०१.२०२२ |
| १० | श्री रेणुकामाता सार्वजनिक विश्र्वस्त निधी मंडळ | २३,०६,०८७/ | RTGS दि.२८.०९.२०२२ |
| ११ | श्रीराम एन्ट्रप्राईजेस, फलटण तर्फे श्री.रामचंद्र ज्ञानेश्वर नाईक-निंबाळकर | ६,०५,८०४/- | RTGS दि. ०८.१२.२०२२ |
| **एकूण रक्कम (रू.)** | | **९,६८,१९,९८०/-** | |

३. सद्यस्थितीत मंडळाकडे ११ (अकरा )परतावा प्रकरणे प्राप्त झालेली असून विविध प्राधिकरण/संस्था/व्यक्ति यांजकडून नजर चुकीने/ अनावधाने मंडळाच्या उपकर खाती भरणा करण्यात आलेल्या रक्कमेचा तपशिल खालीलप्रमाणे-

| **अ. क्र.** | **प्राधिकरण/ संस्था/व्यक्ति चे नांव** | **उपकर परताव्याचे कारण** | **उपकर परताव्याच्या मागणी (रु.)** |
|---|---|---|---|
| १ | पंकज तुळशीराम नाईक,ता.भिवडी,जि.ठाणे | श्री. पंकज तुळशीराम नाईक यांनी जिल्हा जलसंधारण अधिकारी, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद ठाणे यांच्याकडून मौजे सरवली येथे सिमेंट कॉंक्रीट बंधार बांधण्याकरिता मंजुरी घेण्यात आली होती बंधाऱ्याच्या तिरावरील व स्थानिक शेतकऱ्यांनी बंधारा बांधण्यास मनाई केली व कामास हरकत घेतल्याने सदरचे काम रद्द करण्यात आले आहे. दि.**२५.०६.२०२१** रोजी उपकराची रक्कम रु.**८,०००/-** मंडळाच्या बँक ऑफ इंडिया खात्यामध्ये जमा | रु.**८,०००/-** |

| अ. क्र. | प्राधिकरण/ संस्था/व्यक्ति चे नांव | उपकर परताव्याचे कारण | उपकर परताव्याच्या मागणी (रु.) |
|---|---|---|---|
| | | केली आहे. अर्जदाराने उपकराची परतावा करण्यास विनंती करण्यात आली आहे. | |
| २ | ग्रामीण पाणी पुरवठा बांधकाम विभाग, जिल्हा परिषद पुणे | कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा बांधकाम विभाग, जिल्हा परिषद पुणे कार्यालयामार्फत मौजे शिरोली ता.खेड येथील नळ पाणी पुरवठा योजनेचे देयक दि.१९.१०.२०२२ रोजी अदा करतेवेळी देयकातील ठेकेदार मे.आकांक्षा एंटरप्राईजेस यांना अदा करावयाची निव्वळ रक्कम रु.१,४८,१३,८७५/-ठेकेदाराच्या खात्यावर जमा करण्याऐवजी नजरचुकीने मंडळाच्या सेंट्रल बँक ऑफ इडिया खाते क्रं ३६७११७८५९१ मध्ये दि.१९.१०.२०२२ रोजी जमा करण्यात आली आहे मंडळास परतावा करण्यास विनंती करण्यात आली आहे | रु.१,४८,१३,८७५/- |
| ३ | रविंद्र रामेकर, यवतमाळ | श्री. रविंद्र मधुकराव रामेकर यांनी बांधकाम करण्याकरिता परवानगी यवतमाळ नगरपरिषद कार्यालयाकडे फाईल दाखल केली होती . उपकर रक्कम रु.१६,४६२/- भरणा करण्याऐवजी नजरचुकीने रु.५०,५२२/- उपकराची रक्कम मंडळाच्या सेंट्रल बँक ऑफ इंडिया खात्यात जमा केली आहे. अतिरिक्त भरणा केलेली रक्कम रु.३४,२६०/- मंडळास परतावा करण्यास विनंती करण्यात आली आहे. | रु. ३४,२६०/- |
| ४ | लोकेश अफताफ मुल्ला, सातारा | डबेवाडी ग्रामपंचायतीत परवाना मिळण्यासाठी अर्ज केला होता. ग्रामपंचायत मधील ग्रामसेविकाची बदली झाल्याकारणाने नव्याने नियुक्ती न झाल्यामुळे, ग्रामपंचायतीचा कोणताही परवाना न घेता अर्जदारांनी स्वत:च्या नावे बँकेतून रक्कम रु.२०,२०३/- मंडळाच्या सेंट्रल बँक ऑफ इंडिया खात्यात | रु. २०,२०३/- |

| अ. क्र. | प्राधिकरण/ संस्था/व्यक्ति चे नांव | उपकर परताव्याचे कारण | उपकर परताव्याच्या मागणी (रु.) |
|---|---|---|---|
| | | जमा केली आहे. ग्रामपंचायती ऐवजी उपविभागीय अधिकारी, सातारा येथून मंजुरी घेऊन उपकराची रेक्कम रु २०,६४८/- एकाच कामासाठी दुबार बांधकाम उपकर भरणा केलेला आहे. पुर्वीचा भरणा करण्यात आलेली धनाकर्षची रक्कम रु.२०,२०३/- परत करण्यासाठी मंडळाला विनंती केली आहे. | |
| ५ | विजय विनायक दाते,पंढरपूर | विजय विनायक दाते यांनी बांधकाम परवानगीसाठी पंढरपूर नगरपरिषद, पंढरपूर येथे फाईल दिली होती. त्यानुसार पंढरपूर नगरपरिषद यांनी बांधकाम कामगार कल्याण उपकर याची गणना **(Calculation)** करुन रक्कम रु.६१,३८०/- भरणा करण्यासाठी चलन देण्यात आले होते. परंतु भरणा करण्यात आलेले चलन नजर चुकीने व कामगार कल्याण उपकर चुकीची गणना केल्यामुळे ज्यादा भरणा करण्यात आले आहे.सुधारित उपकर यांची गणना करुन उपकराची भरणा रक्कम रु.१०,९८३/- इतका होत आहे. अतिरिक्त भरणा केलेली रक्कम(६१,३८० - १०,९८३= ५०,३९७)रक्कम रु.५०,३९७/- इतक्या उपकर परताव्याची श्री. विजय विनायक दाते यांनी विनंती केली आहे. | रु.५०,३९७/- |
| ६ | सुरज भोजराम फंदे, ता.भंडारा, जि.भंडारा | श्री सुरज भोजराम फंदे यांनी परसोडी गट क्रं. २७७/अ/१/५,२५८ येथील प्लॉट क्रं.३, क्षेत्र ३६७.०८ चौ.मी. वर इमारत परवानगी मिळण्याकरिता ग्रामपंचायत कार्यालय , परसोडी येथे अर्ज करण्यात आला होता. ३०० चौ.मी. पेक्षा अधिक असल्याचे ग्रामपंचायतीला लक्षात आले, मंजुरी दिलेल्या | रु. २६,६६४/- |

| अ. क्र. | प्राधिकरण/ संस्था/व्यक्ति चे नांव | उपकर परताव्याचे कारण | उपकर परताव्याच्या मागणी (रु.) |
|---|---|---|---|
| | | बांधकाम परवानगी रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. मंडळाच्या खात्यात जमा करण्यात आलेली उपकर रक्कम **रु.२६,६६४/-** सुरज भोजराम फंदे यांच्या नावे डिमांड ड्राफ्ट काढून तसे ग्रामपंचायत कार्यालय परसोडी यांना कळविण्यात यावे अशी मंडळाला विनंती करण्यात आली आहे. | |
| ७ | सौ. प्रिती फुलजी कोकणी, नंदुरबार | श्रीमती फुलजी प्रिती कोकणी यांनी मौजे खामगांव तालुका जि.नंदुरबार येथे बांधकाम परवानगी अर्ज सादर केला होता . उपकर रक्कम रु.**३०,२७९/-** इतका उपकर भरणा करण्याऐवजी नजरचुकीने मंडळाच्या खात्यात उपकर रक्कम रु.**४१,३१४/-** इतका भरणा करण्यात आला आहे. जादा भरणा करण्यात आलेली उपकराची रक्कम रु.**११,०६२/-** - परत करण्यास मंडळास विनंती करण्यात आलेली आहे. | रु. **३०,२७९/-** |
| ८ | **आदर्श शिक्षण मंडळ, ता.मिरज, जि.सांगली** | **आदर्श शिक्षण मंडळ, मिरज** यांनी बांधकाम परवानगीसाठी **जिल्हाधिकारी कार्यालय , सांगली** यांना परवानगी मिळणेबाबत विनंती केली आहे . **सांगली** यांनी बांधकाम कामगार कल्याण उपकर याची गणना **(Calculation)** करुन उपकर रक्कम रु.७,९८,३७४/- मंडळाच्या बँक खात्यात जमा करण्यास कळविले होते.तसेच बांधकाम विकास शुल्क रक्कम रु.२,३९,०१६/- तसेच अतिरिक्त बांधकाम क्षेत्र अधिमुल्य रक्कम रु.५,७१,३२०/- स्टेट बँक ऑफ इंडिया येथील खाते क्रं.०२१७०१६१०१ मध्ये जमा करण्यास कळविले होते. परंतु नजरचुकीने संबधित संस्थेने मंडळाचे खाते क्रं ३६७११७८५९१ जमा केला असल्याचे अर्जदाराने कळविले आहे.अर्जदाराने | रु.८,१०,३३६/- |

| अ. क्र. | प्राधिकरण/ संस्था/व्यक्ति चे नांव | उपकर परताव्याचे कारण | उपकर परताव्याच्या मागणी (रु.) |
|---|---|---|---|
| | | नजरचुकीने मंडळाकडे भरणा केलेली रक्कम रु.२,३९,०१६+५,७१,३२०=८,१०,३३६ मंडळाकडे परताव्यची मागणी केली आहे. | |
| ९ | **नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ ,नागपूर** | **नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ , नागपूर** यांनी दि. **२०.०७.२०२२** रोजी अर्ज सादर केला होता. यांना अधिनस्त कार्यरत वर्ग-**३** आणि वर्ग-**४** च्या कर्मचाऱ्यांचे माहे जून **२०२०,** डिसेंबर **२०२०** आणि जून **२०२१** या कालावधीचा अर्धवार्षिक कामगार निधीची वर्गणी रक्कम रु. **८,८३४/-** कामगार कल्याण खात्यात भरणा करण्याऐवजी नजरचुकीने मंडळाच्या उपकर भरणा केला आहे . मंडळाकडे परताव्यची मागणी केली आहे. | रु. **८,८३४/-** |
| **१०** | मुख्याधिकारी, संगमनेर नगरपरिषद, | मुख्याधिकारी, संगमनेर नगरपरिषद, संगमनेर यांचे दिनांक **१४.०६.२०२२** रोजी अर्ज सादर केला होता. सप्टेंबर **२०२१** मध्ये ठेकेदारांच्या बिलातुन वसूल करण्यात आलेली उपकर रक्कम रु.**२,२६,९९९/-** संगमनेर नगरपरिषद, संगमनेर मार्फत सेंट्रल बँक ऑफ इंडिया खात्यामध्ये दि.**२५.१०.२०२१** रोजी भरणा करण्यात आली आहे. ठेकेदाराच्या बिलातून श्री. एन.के.गाडे यांची कपात करण्यात आलेली रक्कम रु.**२,१५,७२१/-** संगमनेर नगरपरिषदेने दि.**२८.०९.२०२१** रोजी नजरचुकीने दुबार उपकर रक्कम मंडळाच्या खात्यात जमा केल्याचे कळविण्यात आले आहे. | रु.**२,१५,७२१/-** |
| **११** | मे. ओरिएन्टल यीस्ट इंडिया | मे. ओरिएन्टल यीस्ट इंडिया प्रा.लि.यांचे दि.**०१.१२.२०२०** रोजी अर्ज सादर केला होता. मे ओरिएन्टल यीस्ट इंडिया प्रा.लि. यांनी त्यांच्या **MIDC** केसुर्डी सातारा | रु.**२०,१३,१७६/-** |

| अ. क्र. | प्राधिकरण/ संस्था/व्यक्ति चे नांव | उपकर परताव्याचे कारण | उपकर परताव्याच्या मागणी (रु.) |
|---|---|---|---|
| | | येथील प्रकल्पाच्या बांधकामा संदर्भात कामगार कल्याण उपकर (BOCW Cess)पोटी रु.**३३,६०,६८०.७९** इतकी रक्कम बांधकाम आराखडे मंजूरीच्या वेळी व त्यानंतर रु.**८,५७,९४३.६१** इतकी रक्कम महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, सातारा या कार्यालयाकडे भरणा केल्याचे कळविले आहे. मे. ओरिएन्टल यीस्ट इंडिया प्रा.लि. या कंपनीच्या प्रकल्पाचे बांधकाम टोयो इंजीनिअर यांचेकडून करण्यात येत आहे व सबंधित टोयो इंजिनिअर यांनीही सदर प्रकल्पाचे बांधकामाचे संदर्भात रु.**२०,१३,१७६/-** दुबार भरणा केलेली आहे. परतावा करण्याबाबत विनंती केली आहे | |
| | | **एकूण** | **रु.१,८०,३१,७४५** |

४. वरीलप्रमाणे या कार्यालयाकडे बांधकाम उपकर परताव्याची प्रकरणे संबंधित प्राधिकरण/संस्था/व्यक्ति यांजकडून तात्काळ निकाली काढण्यासाठी सातत्यपुर्ण पाठपुरावा होत असतो. क्षेत्रिय कार्यालयांच्या पडताळणी अहवालानंतर मंडळ स्तरावरुन छाननी होवून मा.मंत्री (कामगार) तथा मा. अध्यक्ष यांचे मान्यतेने संबंधित परतावा प्रकरणे निकाली काढण्याची कार्यपध्दती आवश्यक आहे.

५. सदर विषयाचे चर्चेवेळी, मा.मंत्री (कामगार) तथा मा. अध्यक्ष यांनी सदर परतावा प्रकरणे अदा करण्यापूर्वी संबंधित प्राधिकरण/संस्था/व्यक्ति यांजकडून त्यांचे यापूर्वीचे बांधकाम उपकर दायीत्व तपासावे व दायीत्वाची रक्कम वसूल करून उर्वरीत परतावा अदा करण्याचे निर्देश दिले

याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव क्र. ५९(१९)/२०२२ :-

(अ) उपरोक्त २२ प्रकरणापैकी अदा झालेली ११ उपकर परतावा प्रकरणे रू. ९,६८,१९,९८०/- यास मंडाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

(ब) उर्वरीत ११ प्रकरणातील प्राधिकरण/संस्था/व्यक्ति यांजकडून नजरचूकीने/ अनावधानाने भरणा केलेल्या एकूण रक्कम रू. १,८०,३१,७४५/- चा परतावा करण्यास मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तथापि, क्षेत्रिय कार्यालयांच्या पडताळणी अहवालानंतर मंडळ स्तरावरुन छाननी करताना संबंधित प्राधिकरण/संस्था/व्यक्ति यांजकडून त्यांचे यापूर्वीचे बांधकाम उपकर दायीत्व तपासावे व दायीत्वाची रक्कम वसूल करून उर्वरीत परतावा मा.मंत्री (कामगार) तथा मा. अध्यक्ष यांचे मान्यतेने अदा करण्यात यावा असा ठराव सर्वानुमते पारीत करण्यात आला.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याण मंडळ, मुंबई

**विषय क्र.२० :- महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत बांधकाम कामगारांची नोंदणी मंडळाच्या अंतर्गत करणेस मंजूरी देणे.**

मंडळ सचिवांनी असे सादर केले की, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत घेण्यात येणाऱ्या विविध कामांचा अंतर्भाव (वृक्ष लागवड व रोपवाटीका ही कामे वगळून) इमारत व इतर बांधकाम कामाच्या व्याख्येत नमूद केलेल्या कामांमध्ये होत असल्यामुळे सदर कामावर काम करणाऱ्या कामगारांची नोंदणी मंडळात करून त्यांना मंडळामार्फत देण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ देण्याबाबतचे निर्देश उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या दि.२५.०२.२०१३ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्राप्त आहेत. तसेच, मंडळामार्फत बांधकाम कामगारांची नोंदणी करण्यात येऊन त्यांना आर्थिक सहाय्य, शैक्षणिक सहाय्य, आरोग्य व सामाजिक सुरक्षिततेचया विविध कल्याणकारी योजनांचा लाभ देण्यात येत आहे. मंडळामार्फत बांधकाम कामगारांची नोंदणी वाढविण्यासाठी वेळोवेळी सर्व जिल्हा कार्यालयांना नोंदणी उपाययोजना शिबीरे आयोजित करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

२. सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने सर्व जिल्हा कार्यालयांनी संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयांशी संपर्क साधून आपल्या जिल्हयातील रोजगार हमी योजनेंतर्गत सद्यस्थितीत कार्यरत ठिकाणे यांची माहिती घ्यावी व सदर कामगारांची नोंदणी मंडळांतर्गत करण्यात यावी व सदर कामगारांच्या ९० दिवस काम केल्याच्या प्रमाणपत्राकरीता संबंधित उपजिल्हाधिकारी (रोजगार हमी योजना) यांचेकडून संबंधित कामगारांची प्रमाणित यादी घेऊन (९० दिवस काम केल्याच्या तपशीलासह) मंडळांतर्गत कामगारांची नोंदणी करण्याबाबत मंडळाच्या दि.१०.११.२०२२ अन्वये कळविण्यात आले आहे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मंडळ कार्यालयास सादर करणेबाबत कळविण्यात आले आहे. अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही प्रस्तावित आहे.

**ठराव क्र.५९(२०)/२०२१ :-**

**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत बांधकाम कामगारांची नोंदणी मंडळांतर्गत करणेबाबत जिल्हा कार्यालयांना कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आले आहे. सदर कार्यवाहीस मंडळाने मान्यता प्रदान केली, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याण मंडळ, मुंबई

## विषय क्र.२१:- मंडळ मुख्यालयाच्या व क्षेत्रिय कार्यालयाच्या सुधारित आकृतीबंधास मान्यता देणे

मंडळाचे सचिव यांनी असे सादर केले की, इमारत व इतर बांधकाम व्यवसायामधील कामगारांच्या हिताचे रक्षण करण्याच्या दृष्टीने, केंद्र शासनाने इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियम (रोजगार नियमन सेवाशर्थी), १९९६ लागू केला आहे. सदर अधिनियमामधील कलम (१८) नुसार प्रत्येक राज्याने इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ गठीत करावयाचे आहे. त्याअनुषंगाने, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्थी) नियम, २००७ अस्तित्वात आले असून, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची स्थापना करण्यात आलेली आहे.

२. शासन निर्णय उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग दि. ०३/१०/२०१२ अन्वये, मंडळाच्या मुंबई मुख्यालयाकरीता १८ पदे आणि जिल्हास्तरावर ३८ पदे अशा एकूण ५६ पदांची निर्मिती मंडळस्तरावर करण्यास शासनाची मान्यता देण्यात आली आहे.शासन अधिसुचना उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग दि. ०१/०६/२०१९ नुसार लिपिक-टंकलेखक, अधीक्षक, लघुटंकलेखक (इंग्रजी / मराठी) यांचे सेवाप्रवेश नियम करण्यात आले आहेत. तसेच, दि. ०७/०६/२०१९ रोजीच्या शासन अधिसूचनेनुसार वाहनचालक, दफ्तरी व शिपाई यांचे सेवाप्रवेश नियम करण्यात आले. दि. २०/०८/२०२० रोजीच्या शासन अधिसूचनेनुसार जिल्हा कार्यकारी अधिकारी व उप जिल्हा कार्यकारी अधिकारी यांचे सेवाप्रवेश नियम करण्यात आले.

३. मंडळाने दिनांक ०५ जुलै, २०१९ रोजीच्या पत्रान्वये १८३ पदे भरतीचा प्रस्ताव शासनास सादर केला होता. तद्नंतर दिनांक २५ नोव्हेंबर, २०१९ अन्वये ४२२ पद भरतीचा प्रस्ताव शासनास सादर केला होता. तथापि, सदर प्रस्तावास अद्याप मान्यता मिळालेली नाही. सद्यस्थितीत ६०२ पदांचा सुधारीत आकृतीबंध प्रस्तावित करण्यात येत आहे.सदर आकृतीबंधास मा.मंत्री महोदय (कामगार) यांनी कामगार आयुक्तांच्या शिफारशीनुसार प्रस्ताव सादर करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

| अ. क्र. | पदनाम | संवर्ग | मुख्यालय | प्रादेशिक सुविधा केंद्र | जिल्हा सुविधा केंद्र | एकूण पदे | पदे भरण्याची कार्यवाही |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी | गट- अ | १ | ० | ० | १ | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्थी) नियम,२००७ मधील कलम (४०) नुसार |
| २ | मुख्य लेखा व वित्त अधिकारी | गट- अ | १ | ० | ० | १ | वित्त व लेखा संवर्गामधून प्रतिनियुक्तीने |

| अ. क्र. | पदनाम | संवर्ग | मुख्यालय | प्रादेशिक सुविधा केंद्र | जिल्हा सुविधा केंद्र | एकूण पदे | पदे भरण्याची कार्यवाही |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | प्रादेशिक कार्यकारी अधिकारी | गट- अ | ० | ६ | ० | ६ | कामगार उप आयुक्त संवर्ग/समकक्ष राज्यसेवा संवर्गामधून प्रतिनियुक्तीने |
| ४ | विधी सल्लागार | गट- अ | १ | ० | ० | १ | विधी व न्याय सेवा संवर्गामधून प्रतिनियुक्तीने |
| ५ | जिल्हा कार्यकारी अधिकारी | गट- अ | ५ | ६ | ३५ | ४६ | दि.२०.०८.२०२० रोजीच्या मंजूर सेवाप्रवेश नियमानुसार |
| गट- अ एकूण पदे | | | ८ | १२ | ३५ | ५५ | |
| ६ | लेखाधिकारी | गट-ब | ५ | ६ | ० | ११ | वित्त व लेखा संवर्गामधून प्रतिनियुक्तीने |
| ७ | सहाय्यक लेखाधिकारी | गट-ब | ० | ० | ३५ | ३५ | |
| ८ | उप जिल्हा कार्यकारी अधिकारी | गट-ब | १० | ६ | ० | १६ | दि.२०.०८.२०२० रोजीच्या मंजूर सेवाप्रवेश नियमानुसार |
| गट- ब एकूण पदे | | | १५ | १२ | ३५ | ६२ | |
| ९ | लघु टंकलेखक उच्चश्रेणी | गट-क | २ | ६ | ० | ८ | दि.०१.०६.२०१९ रोजीच्या मंजूर सेवाप्रवेश नियमानुसार |
| १० | लघु टंकलेखक निम्नश्रेणी | गट-क | २ | ० | ० | २ | दि.०१.०६.२०१९ रोजीच्या मंजूर सेवाप्रवेश नियमानुसार |
| ११ | अधीक्षक | गट-क | १० | ६ | ३५ | ५१ | दि.०१.०६.२०१९ रोजीच्या मंजूर सेवाप्रवेश नियमानुसार |

| अ. क्र. | पदनाम | संवर्ग | मुख्यालय | प्रादेशिक सुविधा केंद्र | जिल्हा सुविधा केंद्र | एकूण पदे | पदे भरण्याची कार्यवाही |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १२ | वरिष्ठ लिपिक | गट-क | १३ | १२ | ७० | ९५ | ५०% सरळसेवा व ५०% लिपिक टंकलेखकामधून पदोन्नतीने |
| १३ | लिपिक टंकलेखक | गट-क | ३० | २४ | १४० | १९४ | दि.०१.०६.२०१९ रोजीच्या मंजूर सेवाप्रवेश नियमानुसार |
| १४ | वाहनचालक | गट-क | ४ | ६ | ३५ | ४५ | दि.०७.०६.२०१९ रोजीच्या मंजूर सेवाप्रवेश नियमानुसार |
| **गट- क एकूण पदे** | | | **६१** | **५४** | **२८०** | **३९५** | |
| १५ | दफ्तरी | गट-ड | १ | ६ | ३५ | ४२ | दि.०७.०६.२०१९ रोजीच्या मंजूर सेवाप्रवेश नियमानुसार |
| १६ | शिपाई | गट-ड | ७ | ६ | ३५ | ४८ | दि.०७.०६.२०१९ रोजीच्या मंजूर सेवाप्रवेश नियमानुसार |
| **गट- ड एकूण पदे** | | | **८** | **१२** | **७०** | **९०** | |
| **एकूण पदे** | | | **९२** | **९०** | **४२०** | **६०२** | |

५. उपरोक्त प्रस्तावित पदांकरिता येणाऱ्या खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे आहे-

| अ. क्र. | पदनाम | संवर्ग | एकूण पदे | सातव्या वेतन आयोगानुसार वेतन श्रेणी | प्रति पद मासिक वेतन रक्कम (रु.) | एकूण वार्षिक खर्च रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी | गट-अ | १ | एस-२५ (रु.७८,८००/- ते रु.२,०९,२००/-) | १,४८,३५१ | १७,८०,२१२ |

| अ. क्र. | पदनाम | संवर्ग | एकूण पदे | सातव्या वेतन आयोगानुसार वेतन श्रेणी | प्रति पद मासिक वेतन रक्कम (रु.) | एकूण वार्षिक खर्च रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | मुख्य लेखा व वित्त अधिकारी | गट-अ | १ | एस-२३ (रु.६७,७००/- ते रु.२,०८,७००/-) | १,२८,३९८ | १५,४०,७७६ |
| ३ | प्रादेशिक कार्यकारी अधिकारी | गट-अ | ६ | एस-२३ (रु.६७,७००/- ते रु.२,०८,७००/-) | १,२८,३९८ | ९२,४४,६५६ |
| ४ | विधी सल्लागार | गट-अ | १ | एस-२० (रु.५६,१००/- ते रु.१,७७,५००/-) | १,०७,५४५ | १२,९०,५४० |
| ५ | जिल्हा कार्यकारी अधिकारी | गट-अ | ४६ | एस-१८ (रु.४९,१००/- ते रु.१,५५,८००/-) | १,०२,४५० | ५,६५,५२,४०० |
| **गट- अ एकूण पदे** | | | **५५** | | **६,१५,१४२** | **७,०४,०८,५८४** |
| ६ | लेखाधिकारी | गट-ब | ११ | एस-१६ (रु.४४,९००/- ते रु.१,४२,४००/-) | ८४,७१२ | १,११,८१,९८४ |
| ७ | सहाय्यक लेखाधिकारी | गट-ब | ३५ | एस-१६ (रु.४४,९००/- ते रु.१,४२,४००/-) | ८४,७१२ | ३,५५,७९,०४० |
| ८ | उप जिल्हा कार्यकारी अधिकारी | गट-ब | १६ | एस-१५ (रु.४१,८००/- ते रु.१,३२,३००/-) | ७९,१४० | १,५१,९४,८८० |
| **गट- ब एकूण पदे** | | | **६२** | | **२,४८,५६४** | **६,१९,५५,९०४** |
| ९ | लघु टंकलेखक उच्चश्रेणी | गट-क | ८ | एस-१५ (रु.४१,८००/- ते रु.१,३२,३००/-) | ७९,१४० | ७५,९७,४४० |
| १० | लघु टंकलेखक निम्नश्रेणी | गट-क | २ | एस-१४ (रु.३८,६००/- ते रु.१,२२,८००/-) | ७३,३८७ | १७,६१,२८८ |

| अ. क्र. | पदनाम | संवर्ग | एकूण पदे | सातव्या वेतन आयोगानुसार वेतन श्रेणी | प्रति पद मासिक वेतन रक्कम (रु.) | एकूण वार्षिक खर्च रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|
| ११ | अधीक्षक | गट-क | ५१ | एस-१४ (रु.३८,६००/- ते रु.१,२२,८००/-) | ७३,३८७ | ४,४९,१२,८४४ |
| १२ | वरिष्ठ लिपिक | गट-क | ९५ | एस-८ (रु.२५,५००/- ते रु.८१,१००/-) | ४९,८३९ | ५,६८,१६,४६० |
| १३ | लिपिक टंकलेखक | गट-क | १९४ | एस-६ (रु.१९,९००/- ते रु.६३,२००/-) | ३८,०७२ | ८,८६,३१,६१६ |
| १४ | वाहनचालक | गट-क | ४५ | एस-६ (रु.१९,९००/- ते रु.६३,२००/-) | ३८,०७२ | २,०५,५८,८८० |
| **गट- क एकूण पदे** | | | **३९५** | | **३,५१,८९७** | **२२,०२,७८,५२८** |
| १५ | दफ्तरी | गट-ड | ४२ | एस-३ (रु.१६,६००/- ते रु.५२,४००/-) | ३२,१४० | १,६१,९८,५६० |
| १६ | शिपाई | गट-ड | ४८ | एस-१ (रु.१५,५००/- ते रु.४७,६००/-) | २९,२६४ | १,६८,५६,०६४ |
| **गट- ड एकूण पदे** | | | **९०** | | **६१,४०४** | **३,३०,५४,६२४** |
| **एकूण पदे** | | | **६०२** | | **१२,७७,००७** | **३८,५६,९७,६४०** |

६. इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियम (रोजगार नियमन व सेवाशर्थी), १९९६ च्या कलम (२४) (३) मध्ये पुढीलप्रमाणे नमूद करण्यात आले आहे - "No Board shall, in any financial year, incur expenses towards salaries, allowances and other remuneration to its members, officers and other employees and for meeting the other administrative expenses exceeding five per cent of its total expenses during that financial year".

त्यानुसार उपरोक्त पदांकरिता होणारा खर्च वार्षिक खर्चाच्या ५% च्या मर्यादेत असणे आवश्यक आहे.

७. सध्या मंडळाच्या आस्थापनेवर मंडळ मुख्यालयात, सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी -०१ पद व मुख्य लेखा व वित्त अधिकारी -०१ पद आणि लेखा अधिकारी -०१ पद असे केवळ ०३ शासकीय अधिकारी पुर्णवेळ कार्यरत आहेत व जिल्हा कार्यकारी अधिकारी हे पद अतिरीक्त कार्यभाराने कार्यरत आहे. याशिवाय ०१ उपलेखापाल प्रतिनियुक्तीने, ०१ वरिष्ठ लिपिक (अतिरिक्त कार्यभाराने) व ०२ लिपिक-टंकलेखक (उसनवारीने) कार्यरत आहेत.

८. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ यांचे व्याप्ती संपुर्ण महाराष्ट्रभर असून मंडळाकडे जास्तीत जास्त नोंदणी,नुतनीकरण व योजनांची प्रभावी अंमलबजावणी आणि पुढील महत्त्वाचे कामे पार पाडणेसाठी मुख्यालय,प्रादेशिक कार्यालय,जिल्हा कार्यालय येथे मनुष्यबळ असणे आवश्यक आहे.

(अ) मंडळाकडे सध्या विविध बँकामध्ये गुंतवणुकीच्या स्वरूपात शिल्लक असलेले रक्कम रू.१०,७२० कोटी, दरवर्षी उप कराच्या माध्यमामधून जमा होणारे सर्वसाधारण रक्कम रु. २,३०० कोटी व विविध योजनांवर दरवर्षी खर्च होणारे रू. ३,५०० कोटी या आर्थिक बाबींचे सुयोग्य लेखांकन,लेखापरिक्षण व नियोजन करणे.

(ब) उपकर संकलनाकरीता प्रभावी यंत्रणा तयार करणे.

(क) बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व लाभ वाटप करणे.

(ड) मंडळाकडील अस्तित्वातील योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे.

(इ) अधिनियमातील तरतूदीनुसार बांधकाम कामगारांच्या हिताचे संरक्षणार्थ अन्य उपाययोजना करणे. याकरीता, मंडळाची प्रशासकीय यंत्रणा सक्षम करणे अत्यावश्यक बाब आहे.

याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र. ५९(२१)/२०२२ :- मंडळाचा सुधारित आकृतीबंध मा. कामगार आयुक्त यांच्या शिफारशीसह शासन मान्यतेस सादर करण्यात यावा, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याण मंडळ, मुंबई

**विषय क्र. २२ :- मंडळाकडे जमा होणाऱ्या उपकराची अचूक पडताळणी होण्यासाठी व उपकर संकलनात वाढ होण्याच्या उपाययोजनेकरिता सनदी लेखापाल (CA)/ तांत्रिक सल्लागार संस्थेची (एजन्सी) नियुक्ती करण्यास मंजूरी देणे.**

याबाबत मंडळ सचिवांनी सादर केले की, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई मंडळाकडे जमा होणारा निधीचे लेखापरीक्षणासाठी सनदी लेखापाल (CA)/ संस्था नेमणूक करण्याची कार्यपध्दती ठरविण्यासाठी मा. मंत्री महोदय, कामगार तथा मा. अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली, मंगळवार दि. ०६.१२.२०२२ रोजी पार पडलेल्या बैठकीमध्ये मंडळाच्या प्रचलित पध्दतीने नियुक्त सनदी लेखापालांकडून सदयस्थितीत बांधकाम उपकराची अचूक पडताळणी, ताळमेळ व लेखापरीक्षण होत नसलेली तसेच बांधकामांचे उपकर दायीत्व तपासण्यासाठी मंडळाकडे तांत्रिक सल्लागार उपलब्ध नसल्याने उपकर संकलनात वाढ होण्याच्या उपाययोजनेकरिता तांत्रिक सल्लागार एजन्सी व सनदी लेखापाल (CA) एजन्सी यांची उपलब्धतेनुसार स्वतंत्रपणे अथवा एकत्रितपणे नियुक्ती बाहयस्त्रोत यंत्रणेकडून करणेसाठी ई- निविदा आवश्यक आहे. ई- निविदेमध्ये संबंधित एनन्सीना मंडळाचे वरील नमुद कामकाजासाठी त्यांचे कामकाज क्षेत्र/ व्याप्ती (Scope Of Work) आखुन दयावे व आवश्यक अटी शर्ती अंतर्भुत कराव्यात.

याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र. ५९(२२)/२०२२:-**

**मंडळाकडे जमा होणाऱ्या उपकराची अचूक पडताळणी होण्यासाठी व उपकर संकलनात वाढ होण्याच्या उपाययोजनेकरिता सनदी लेखापाल (CA)/ तांत्रिक सल्लागार संस्थेची (एजन्सी) नियुक्ती करण्यासाठी ई- निविदा करणेस मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याण मंडळ, मुंबई

**विषय क्र. २३:- मंडळाचे सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाच्या "वार्षिक जमा खर्चाच्या लेख्यास" (Annual Account) मंडळाची मान्यता घेणे व तदनंतर सदर लेखे राज्य शासन व महालेखापाल कार्यालयास सादर करणेस मंजूरी देणे.**

याबाबत मंडळ सचिवांनी सादर केले की, मंडळाचे सन २०२०-२१ या वर्षाचे वार्षिक लेखे मंडळाने नियुक्त केलेल्या सनदी लेखापाल (CA) मे. टी. व्ही. एच. शाह आणि कंपनी, मुंबई यांनी तयार व प्रमाणित केले आहेत. सदर लेखे मंडळाच्या मान्यतेस सादर करण्यात येत आहेत. मंडळाच्या मान्यतेनंतर सदर लेख्यांचे संव्यवहार लेखापरिक्षण (Transaction Audit) करण्यासाठी मा. भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांना विनंती करण्यात येईल.

**सन २०२०-२१ मधील जमा व खर्चाचा गोषवारा**

(रू.कोटीत)

| अ.क्र. | जमेची बाब | जमा रक्कम | खर्चाची बाब | खर्च रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | उपकर | १४०४.२३ | विविध कल्याणाकारी योजनांवरील खर्च | १०३२.७५ |
| २. | नोंदणी शुल्क | १.५६ | प्रशासकीय खर्च | ३२.९४ |
| ३. | बँकेतील मुदत ठेवीवरील व्याज | ५६४.९२ | उपकर जमा करण्याचा खर्च १% च्या मर्यादेत | १४.०५ |
| ४. | इतर जमा | ०.८२ | घसारा | ०.१५ |
| | **एकूण जमा** | १९७१.५३ | **एकूण खर्च** | १०७९.८९ |
| ५. | | | शिल्लक | ८९१.६४ |
| | **एकूण** | **१९७१.५३** | **एकूण** | **१९७१.५३** |

याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र. ५९(२३)/२०२२:-**

**मंडळाचे सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाच्या "वार्षिक जमा-खर्चाच्या लेख्यास" (Annual Account) मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येवून तद्नंतर सदर लेखे राज्य शासन व महालेखापाल कार्यालयास सादर करणेस मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याण मंडळ, मुंबई

**विषय क्र.२४ :- मंडळाकडील बांधकाम कामगारांना सुरक्षा संच व अत्यावश्यक संच पुरविणाऱ्या योजनेचा आढावा घेणे व दि.०१.०४.२०२२ रोजी नंतर नोंदीत बांधकाम कामगारांना सुरक्षा संच व अत्यावश्यक संचाचे वाटप करणे तसेच, निर्धारित लक्षांकानुसार शिल्लक संच वाटपाचे मागणीनुसार जिल्हयांना लक्षांक निर्धारण करणे व योजनेस मुदतवाढ देण्याच्या धोरणात्मक निर्णयास मंजूरी देणे.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, शासन आदेशानुसार २,२५,००० सुरक्षा संच व अत्यावश्यक संच वितरणाकरीता ई- निविदा प्रकिया राबवून संस्था व दर निश्चितीची कार्यवाही करण्यात आली होती.

२. सुरक्षा संच व अत्यावश्यक संच वाटपाचे खालीलप्रमाणे पुरवठा आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.

| अ.क्र. | शासन मान्यता/निर्देश पत्र | मंडळाचे पुरवठा आदेश दिनांक | सुरक्षा संच | अत्यावश्यक संच |
|---|---|---|---|---|
| १ | निविदा स्विकृती दिनांक ०९.०४.२०१८ | १४.०६.२०१८ | २,२५,००० | २,२५,००० |
| २ | दिनांक १५.०६.२०१९ | १४.०६.२०१९ | १,८५,००० | १,८५,००० |
| ३ | दिनांक १५.०६.२०१९ | ०५.०८.२०१९ | २,६८,१४० | २,६८,१४० |
| ४ | दिनांक १५.०६.२०१९ | १६.०८.२०१९ | २,४९,५९० | २,४९,५९० |
| ५ | दिनांक २१.१२.२०१९ | ०४.०१.२०२० | ४,५३,००० | ४,५३,००० |
| ६ | दिनांक ०२.०६.२०१९ | ११.०६.२०२१ | ३,५०,००० | ३,५०,००० |
| ७ | दिनांक १५.१२.२०२१ | २३.१२.२०२१ | ४,००,००० | ४,००,००० |
| **एकूण** | | | **२१,३०,७३०** | **२१,३०,७३०** |
| **दिनांक ०९.०६.२०२२ अखेर वाटप करण्यात आलेल्या संचाची संख्या** | | | **१९,४१,५५५** | **१९,४१,५५५** |
| **शिल्लक संचाची संख्या** | | | **१,८९,१७५** | **१,८९,१७५** |

**३.** मंडळाच्या दिनांक २४.०६.२०२२ अन्वये ज्या बांधकाम कामगारांना सुरक्षा संच व अत्यावश्यक संच प्राप्त झालेले नाही याबाबतचा प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात आला होता.

**४.** मा. महालेखापाल कार्यालयाच्या दिनांक ०१.११.२०२० ते दिनांक ३१.०३.२०२२ या कालावधीत मंडळाच्या मुख्यालयाचे लेखा परीक्षण करताना मा. महालेखापाल कार्यालयाने दिनांक २२.०३.२०२१ रोजीच्या केंद्र शासनाच्या पत्राद्वारे दिलेल्या निर्देशाचे पालन केले नसून मंडळामार्फत देण्यात येणाऱ्या योजनांचे लाभ वस्तू स्वरूपात वितरीत न करण्याबाबत

आक्षेप नोंदविला आहे. तसेच, संच वितरण करणाऱ्या संस्थांना वेळोवेळी मुदतवाढ देण्यावरही आक्षेप नोंदविला आहे.

**५.** वरीलप्रमाणे शासनास सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने दिनांक २१.०६.२०२२ रोजीच्या पत्रान्वये खालीलप्रमाणे मान्यता प्रदान केली आहे.

दि.**३१.०३.२०२२** पर्यंत नोंदणी तथा नुतनीकरण झालेल्या परंतु संच वाटप न झालेल्या शिल्लक वाटप करावयाचे **१,८९,१७५** इतके संच वगळता अधिकचे **३,९४,४९३** इतक्या नोंदीत सक्रिय बांधकाम कामगारांना संच वाटप करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली.

**६.** वरील शासन मान्यतेस अनुसरून दि.**३१.०३.२०२२** पर्यंत व त्यानंतर नोंदीत होणाऱ्या बांधकाम कामगारांना सुरक्षा संच व अत्यावश्यक संच वाटप करण्यामध्ये भेदभाव केल्यास योग्य ठरणार नाही त्यामुळे **१,८९,१७५** संच व अधिकचे **३,९४,४९३** संच असे एकूण **५,८३,६६८** संच वाटपाच्या मर्यादेपर्यंत दि.**३१.०३.२०२२** च्या आधी व वाटप करेपर्यंत नोंदीत झालेल्या सर्व बांधकाम कामगारांना सुरक्षा संच व अत्यावश्यक संच वाटप करण्यास मान्यता प्रदान करणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावास शासनाने दिनांक **२३.०६.२०२२** अन्वये मान्यता प्रदान करण्यात आली होती.

**७.** वरीलप्रमाणे शासन मान्यतेस अनुसरून **३,९४,४९३** सुरक्षा संच व अत्यावश्यक संच वाटपाचे पुरवठा आदेश दि.**२४.०६.२०२२** रोजी निर्गमित करण्यात आलेले आहेत. त्यानुसार संच वाटपाची कार्यवाही करण्यात येत आहे.

**८.** सद्यस्थितीत जिल्हा कार्यालयामार्फत वाटप करण्यात आलेल्या संचापैकी शिल्लक संचाची संख्या विचारात घेऊन दि.**३१.०३.२०२३** अखेर अतिरिक्त सुरक्षा संच व अत्यावश्यक संच पुरवठा करण्याकरीता मागणी करण्यात येत आहे.

| अ.क्र. | जिल्हा | सुरक्षा संचाची संख्या | अत्यावश्यक संचाची संख्या |
|---|---|---|---|
| १. | मुंबई शहर | १०,००० | १०,००० |
| २. | मुंबई उपनगर पूर्व | ३००० | ४००० |
| ३. | मुंबई उपनगर पश्चिम | ४००० | ३००० |
| ४. | ठाणे | ८००० | ८००० |
| ५. | कल्याण | ८००० | ८००० |
| ६. | रायगड | ८००० | ८००० |
| ७. | पालघर | २२००० | २२००० |
| ८. | रत्नागिरी | ९००० | ९००० |
| ९. | सिंधुदूर्ग | ७००० | ७००० |
| | एकूण | **७९०००** | **७९०००** |
| १०. | नागपूर | ३७२२४ | ३७२२४ |

| अ.क्र. | जिल्हा | सुरक्षा संचाची संख्या | अत्यावश्यक संचाची संख्या |
|---|---|---|---|
| ११. | भंडारा | २११८० | २११८० |
| १२. | गोंदीया | ११,००३ | ११,००३ |
| १३. | चंद्रपूर | ३७८५१ | ३७८५१ |
| १४. | वर्धा | ५६२५४ | ५६२५४ |
| १५. | गडचिरोली | ३४७०० | ३४७०० |
| | **एकूण** | **१९८२१२** | **१९८२१२** |
| १६. | अमरावती | २०००० | २०००० |
| १७. | अकोला | ३५००० | ३५००० |
| १८. | वाशिम | ५००० | ५००० |
| १९. | बुलडाणा | २०००० | २०००० |
| २०. | यवतमाळ | २०००० | २०००० |
| | **एकूण** | **१००००० ** | **१०००००** |
| २१. | पुणे | ५०००० | ५०००० |
| २२. | सांगली | ४०००० | ४०००० |
| २३. | इचलकरंजी | १५००० | १५००० |
| २४. | सातारा | १५००० | १५००० |
| २५. | सोलापूर | ३३००० | ३३००० |
| २६. | कोल्हापूर | ४३००० | ४३००० |
| २७. | बार्शी | ०० | ०० |
| | **एकूण** | **१९६०००** | **१९६०००** |
| २८. | नाशिक | ३०००० | ३०००० |
| २९. | जळगांव | २०००० | २०००० |
| ३०. | अहमदनगर | ३०००० | ३०००० |
| ३१. | धुळे | १०००० | १०००० |
| ३२. | नंदुरबार | १०००० | १०००० |
| | **एकूण** | **१०००००** | **१०००००** |
| ३३. | औरंगाबाद | ५१४७० | ५१४७० |
| ३४ | नांदेड | ५१३०६ | ५१३०६ |
| ३५ | लातूर | १७०६१ | १७०६१ |
| ३६ | जालना | ४१६४९ | ४१६४९ |
| ३७ | परभणी | २०००० | २०००० |
| ३८ | हिंगोली | १४७८७ | १४७८७ |
| ३९ | बीड | ३२२९२ | ३२२९२ |

| अ.क्र. | जिल्हा | सुरक्षा संचाची संख्या | अत्यावश्यक संचाची संख्या |
|---|---|---|---|
| ४० | उस्मानाबाद | १२८०० | १२८०० |
| | एकूण | २४१३६५ | २४१३६५ |
| | एकूणांत | ९१४५७७ | ९१४५७७ |

९. सद्यस्थितीत जिल्हा कार्यालयाकडे उपलब्ध असलेल्या सुरक्षा संच व अत्यावश्यक संच संख्या वगळून जिल्हानिहाय **९,१४,५७७** सुरक्षा संच व अत्यावश्यक संचाची मागणी करण्यात आली आहे. तरी, अतिरिक्त संच पुरवठाबाबतचा प्रस्ताव मंडळाच्या विचार-विनिमयाकरीता सादर करण्यात आला होता.

**१०.** त्याबाबत मा. अध्यक्ष तथा मंत्री महोदय,कामगार विभाग यांनी मंडळामार्फत दिनांक **२३.०६.२०२२** रोजी देण्यात आलेल्या पुरवठा आदेशातील नमूद संचापैकी किती संच वितरीत करणे बाकी आहे याचे अवलोकन करून जिल्हा कार्यालयांना आवश्यक असलेल्या सुधारित संचाचे प्रस्ताव मान्यतेस सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या

सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र.५९(२४)/२०२२:-**

**मंडळाकडील बांधकाम कामगारांना सुरक्षा संच व अत्यावश्यक संच पुरविणाऱ्या योजनेचा आढावा घेऊन दि.२३.०६.२०२२ रोजी देण्यात आलेल्या पुरवठा आदेशातील नमूद संचापैकी किती संच वितरीत करणे शिल्लक आहे याचा ताळमेळ घेऊन जिल्हा निहाय सुधारित पुरवठा लक्ष्यांक निश्चित करण्यास व जिल्हा कार्यालयाची अतिरिक्त मागणी असल्यास संच वाटपाचा लक्ष्यांक निर्धारित करून प्रस्ताव शासन मान्यतेस्तव सादर करावा व शासन मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करावी, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याण मंडळ, मुंबई